शनिवार
१० नोव्हेंबर १९७९
७५ पैसे

# माणूस

मुद्दा असा आहे, की जर
जनता सरकार मुसलमानविरोधी,
ख्रिश्चनविरोधी, मागासवर्गीय-
विरोधी असते तर त्या सरकारने
ॲडमिरल परेरिया, चीफ मार्शल
लतीफ यांना दूर करायला
हवे होते....
केले का हे जनता सरकारने ?

—जॉर्ज
१२ जुलै १९७९



# जनता पक्षाची २८ महिन्यातली अभिमानास्पद कामगिरी

पृष्ठ....१

# जाब विचारा जाब !

पांढऱ्या धुव्वट डगल्यातले
खळणीबाज फुडारी
येतील आता आपल्यापुढे पुन्हा ....

आणि लागतील बेतालपणाने
तोंडास येईल ते
बडबडायला पुन्हा ....

वागतील सरळ, पाडतील भुरळ
करून शब्दांची
दिलखेचक आतषबाजी पुन्हा ....

.... खरे तर, त्यांना ठावा असतो
त्यांचा गुन्हा
पण त्यांना हेही ठाऊक असते
की, लोकांचे स्मरण तकलादू असते–
पब्लिक मेमरी इज व्हेरी शॉर्ट–
आणि म्हणून पुन्हा ....

तेच रंग, तेच ढंग आणि तेच सोंग
घेऊन येतील फुडारी
आपल्यापुढे पुन्हा ....

पण दोस्तांनो !

जागे रहा !
हुश्शार !!

आणि आता यावेळी नुसत एकू नका,
तर ऐकवा बेट्यांना–
त्यांनी रचलेला त्यांच्या पापांचा
भला मोठा डोंगर–

या देशाच्या–या देशातील
कोटयवधी गोरगरिबांच्या
नि:सत्त्व बरगड्यांवर ...

दाखवा त्यांना भर लोकसभेत
नागवी केलेली आपली
पवित्र लोकशाही ...

ऐकवा त्यांना, त्यांचा दुर्योधनी
पराक्रम !
ऐकवा त्यांना, त्यांचा दु:शासनी
पुरुषार्थ !

आणि–
आणि याचा जाब विचारा
जाब !

– राजा मंगळवेढेकर

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : चोविसावा
१० नोव्हेंबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत
असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक
संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर
यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे
छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

# सप्रेम नमस्कार

◘ 'एक होता कार्व्हर' या (दिवाळी अंकातील) लेखासंबंधीचे हे पत्र. प्रस्तुत लेख– तुमच्या भाषेत कादंबरी– लिहिल्याबद्दल लेखिकेचे हार्दिक आभार आणि संपादनाबद्दल तुम्हास धन्यवाद. झपाटल्यागत (वाचून झाल्यानंतर) झालं.

प्रस्तुत प्रदीर्घ लेखातून सर्वांनाच–राज्यकर्ते, समाज, शिक्षक, विद्यार्थी आणि तथाकथित व्यापाऱ्यांना बरेचसे घेण्यासारखे आहे; पण या साऱ्यांचे लक्ष जाईल तेव्हा ना?

आजच्या गढूळ, गलिच्छ, स्वार्थी राजकारणात तर हा लेख प्रसिद्ध करून आपण औचित्य दाखवले आहेच; पण समाज प्रबोधन करण्याची आपली परंपरा चालूच ठेवलीत याबद्दल (एक माणूस परिवारातील बिंदू म्हणून) अभिमान वाटतो.

लेखिकेला आभार कळवा.

२० ऑक्टो. ७९ **दत्तात्रय ना. जोशी**
निपाणी

◘ आपल्या दिवाळी अंकातील 'राष्ट्रपती भवन'वरील प्रतिभा रानडे यांचा श्री. मुकुंद रानडे यांच्या 'A Palace in Democracy' या आगामी पुस्तकातील मजकुरावरून अनुवाद केलेला लेख वाचण्यात आला. त्यात १९११ मध्ये 'पाचव्या एडवर्ड'ने राजधानी दिल्लीस आणून पायाचा दगड बसविला असा उल्लेख आहे. 'पाचवा एडवर्ड' हे चूक आहे. 'पाचवा जॉर्ज' असे पाहिजे. व्हिक्टोरिया– सातवा एडवर्ड– पाचवा जॉर्ज, आठवा एडवर्ड– (पदच्युत) सहावा जॉर्ज व एलिझाबेथ अशी परंपरा आहे.

१३ ऑक्टो. ७९ **श्री. गो. फणसळकर**
पुणे

◘ दिवाळीत एका स्नेह्याकडे फराळास गेलो होतो. तेथे आपला 'माणूस' भेटला. सहज अंक चाळण्यास सुरुवात केली आणि डॉ. कार्व्हर दिसले. नवीन 'माणूस' व लेखिकाही नवीनच. जुजबी ओळख करून घ्यावी असे वाटले– पण संपादकसाहेब, डॉ. कार्व्हर महावस्ताद माणूस! ती ओळख अगदी पक्की झाली; घरी जातानाच बुकस्टॉलवरून 'माणूस' घ्यावा लागला! आपण 'माणूस'मधून एका खऱ्याखुऱ्या माणसाची भेट आम्हाला दिली. आपणास व सौ. वीणाताईंना शतशः धन्यवाद!

मी 'माणूस'चा नियमित वाचक नव्हतो. पण आता–! यापुढे आपल्या माणूसमधून अशीच खऱ्याखुऱ्या माणसांची भेट घेण्याची मनस्वी इच्छा बाळगून आहे.

२७ ऑक्टो. ७९. **सुधाकर कराळे**
देवळाली प्रवरा

◘ या वर्षीच्या दिवाळी अंकामध्ये सर्वप्रथम 'माणूस' वाचला. अंकातील निवडक व काही चांगल्या लेखाबद्दल अभिनन्दन!

'केदार आणि मारायण' वाचताना श्री. कुलकर्णींच्या पुस्तकातील जुनी मराठी भाषा वाचून, लहानपणी परिचित असलेले शब्द पण आता मागे पडलेले, वाचून बरं वाटलं. असे आपल्या भाषेतील कितीतरी शब्द काळामागे पडले आहेत.

लेखक श्री. चंद्रकांत वर्तक यांना सांगावे की, साठएक वर्षांपूर्वी मी चित्रमय जगतमध्ये एका शाळामास्तराने लिहिलेले हिमालयाची यात्रा (असंच काही तरी नाव) वर्णन वाचलेले आहे. ते मास्तरसुद्धा असेच चिकित्सक, उघडचा डोळ्यांनी प्रवास करणारे, अवलोकवन्त होते. त्यांच्याबद्दल मला एवढेच आठवते की त्यांच्याजवळ पैसा नव्हता; पण प्रवासाची अतीव आवड. म्हणून ते कोणा श्रीमंत माणसाबरोबर शागीर्दीसारखे प्रवास करून आपली प्रवासाची आवड भागवीत असत. नेपाळात त्यांना एक ५७ वर्षांचा गुरखा भेटला होता. त्याने आपल्या आयुष्यात फक्त दोन वेळा स्नान केले होते.

सौ. वीणा गवाणकर यांचा पहिलाच लेख (असे वाटते हं) इतका उत्कृष्ट आहे की, त्यांचे अभिनंदन करावे.

एकाच अंकात दोन चित्रपटवीरांचा परिचय! पाध्ये लेखक असतानाही डॉ. श्रीकांत मुंदरगी यांचा लेख मला उजवा वाटतो. Small Scale Industries वरील डॉ. कल्याणी यांची श्री. गुप्ते यांनी घेतलेली मुलाखत मोठी उद्बोधक असली तरी ती अजून सविस्तर पाहिजे होती असे वाटते.

२४ ऑक्टो. ७९ **द. वि. पोतनीस**
मद्रास

◘ किंमत परवडत नसतांसुद्धा 'माणूस' दिवाळी १९७९ अंक विकत घेऊन वाचला. समाधान पावलो. पैसे नेहमीप्रमाणे कारणी लागले.

आपले 'मणिकांचन' हे संपादकीय विचार करायला लावणारे आहे,

सच्चिदानंदबाबा 'आदरे लेखकु झाला' तो कसा, हे दि. बा. मोकाशी यांनी मनोरंजक व माहितीपूर्ण रीतीने सांगितले आहे.

पाल गॅलिको यांची 'हिमहंसी' ही भावपूर्ण कथा फार सुरेख आहे.

एडविन लचिन्स या वास्तुकलातज्ज्ञाच्या चिकाटीचे दर्शन प्रतिभा रानडे यांच्या राष्ट्रपती भवनावरील लेखात होते. अखंड परिश्रम, अभ्यास, निष्ठापूर्ण जीवन या गुणांवर जगलेले डॉ. जॉर्ज वाशिंग्टन कार्व्हर यांचे जीवनदर्शन तर अपूर्व वाटले.

'लोकशाहीकडून प्रजाप्रभुत्वाकडे' या विनय हर्डीकर यांच्या लेखात अलीकडील राजकीय घटनांतील विविध घटक व त्यांतील कार्यकारणभाव यांचे विश्लेषण अभ्यासपूर्ण वाटले. त्यातील निष्कर्ष आपल्या 'मणिकांचन' या संपादकीयातील विचारांशी मिळतेजुळतेच आहेत.

जनता पक्षाचे यशापयश समजावून देताना लेखकाने दिलेली घटकवाद, पक्षांतराचे खुले स्वागत, उदारमतवादी तत्त्वांचे फारच स्तोम, सततच्या निवडणुकांमुळे निर्माण झालेली परिस्थिती, जनता पक्षाच्या अल्पावधीतील यशाची जाहिरात करण्यात अपयश इ.कारणे बरोबर वाटतात. परंतु पंतप्रधान नेमणुकीतच या वादाचे बीज सुरुवातीस दिसून आले

होते. लोकशाहीच्या मार्गात नेमणूक, मग ती कशीही असो, बसत नाही. या प्रसंगाचा उल्लेख महत्त्वपूर्ण ठरला असता, कारण 'प्रथमग्रासे मक्षिकापात:' म्हणतात तद्वत त्याच वेळेपासून श्री. रामधन इ. नी नाराजीचा सूर लावून, राजिनामा देऊन पुढील नाटचाची नांदी म्हटली होती.

'चिकमगळूर' या पुढील विभागात लोकनेते व लोकशाहीतील सध्याचे बहुतांश लोकशहा यांतील फरक चांगला सांगितला आहे. 'सहकार्याच्या वाटा व वळणे' या विभागात जनसंघ व समाजवादी घटकातील जनता पक्षांतर्गत परस्परसंबंधांचा विचार करताना रा. स्व. संघाविषयीच अधिक लिहिले गेले आहे. परस्परसंबंधातील तणावांवर अधिक प्रकाश पडलेला नाही. मात्र यातील विचार स्वागतार्हच आहेत. संघटनकार्यावर वैचारिक पातळीचे कलम व्हायला हवे असे लेखक सुचवितात, परंतु वैचारिक पातळी म्हणजे नेमके काय अभिप्रेत आहे ते लक्षात येत नाही.

'उदंड चिकित्सा, कृती शून्य' या विभागात पत्रकार, साहित्यकार इ. बुद्धिजीवी वर्गांच्या डोळ्यांत अंजन चांगले घातले आहे.

या सर्व परिस्थितीसंबंधाने जाता जाता काही शंका उद्भवतात त्या विचारतो.

आपल्या या समाजात असे पुष्कळ तरुण असतील की, ज्यांना आपल्या विशिष्ट कार्यक्षेत्रातच समाजोपयोगी काही कार्य आपण करावे असे वाटत असेल. अशा संवेदनाक्षम तरुणांच्या काही अडचणी असतात त्यांचा कुणी विचार करील का?

उदाहरणार्थ, शहरातील गर्दी कमी करून खेड्याकडे, मागासलेल्या दुर्गम भागांकडे जावे असे सांगितले जाते. एखादा तरुण चांगला डॉक्टर आहे. त्याला आपणही काही समाजकार्य करण्याची तीव्र इच्छा आहे. परंतु त्याने पूर्वायुष्यात स्वीकारलेल्या काही कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात. त्या सोडून जायचे कसे ही त्याची चिंता असते. सर्वच काही सावरकरांसारखे सर्वस्व त्याग करून जाणारे असत नाहीत. तर ज्याच्या त्याच्या देशकाल परिस्थितीनुरूप व इच्छेनुरूप ज्याला त्याला समाजसेवा करता येईल यासाठी विविध मार्गांचे दर्शन तपशीलाने कोणीच करीत नाही. अर्थात् माझी अशी खात्री आहे की असे संवेदनाक्षम तरुण समाजात निश्चित आहेत व ते आपापल्या क्षेत्रात त्यांच्या समजुतीनुसार व क्षमतेनुसार काही तरी कार्य करीतच आहेत. परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन झाले तर ते अधिक उपयुक्तपणे कार्य करू शकतील.

कित्येक तरुण जेथे सेवा करीत असतात (नोकरी) तेथील एकंदर प्रशासकीय (नोकरशाही) व्यवस्थेमुळे इच्छा असूनही चांगल्या प्रकारे काम करता येत नाही त्यांनी काय करावे? कारण त्यांना त्या विशिष्ट क्षेत्राबाहेर जाणे शक्य नसते.

२४ आक्टो. ७९ **रमेश वामन परांजपे**
मालाड

◘ यावेळचा 'दिवाळी अंक' नेहमीप्रमाणे उत्कृष्ट! परंतु खरी मजा आणली आहे ती सौ. वीणाताईंनी. 'एक होता कार्व्हर' ही एक नुसती अमेरिकेतील काळ्या (निग्रो) असामान्य व्यक्तीची कहाणी नसून आजच्या भारतीय समाजाला मार्गदर्शन करणारा तो मानवी दीपस्तंभ ठरेल.

असो. मी तो लेख येथे बऱ्याच मंडळींना वाचावयास दिला होता. प्रत्येकजण माझ्यासारखाच भारावून गेला.

३० आक्टो. ९७ **बंडोपंत सरपोतदार**
नवी दिल्ली



*With Best Compliments*

*From*

# CHAMPAKLAL INVESTMENT & FINANCIAL CONSULTANCY LIMITED

**Your Friendly Merchant Banker**

Regent Chambers, 2nd Floor,
208 Ceremonial Boulevard
Nariman Point
BOMBAY 400 021.



वय वर्षे 'केवळ' साठ....!

# पुल्देशपांडे मराठी माणसाला गावलेला परिस

डॉ. भीमराव कुलकर्णी

विसाव्या शतकाची अधिअधिक वाटचाल संपून गेली आणि राहिलेले अर्धशतक अक्षरश: गाजविणाऱ्या एका प्रभावी साहित्यिकाच्या प्रतिभेला असाधारण धुमारे फुटू लागले...

–पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे...पु. ल. देशपांडे...पुल

मराठी रसिकांची मने चौफेर खेचून घेणारा, (Pull) या अर्थाने त्यांचे 'पुल' हे संक्षिप्त नामाभिधान पन्नाशीनंतरच्या काळात विलक्षण लोकप्रिय झाले. साहित्याच्या प्रांतातील मातबर पिढी आपल्या नावाची आद्याक्षरे सन्मानाने मिरवीत होती परंतु ती त्यांच्या आडनावांनीच ...फडके, खांडेकर, माडखोलकर...ओळखली जात होती आणि नव्या उमेदीने लिहिणाऱ्या पिढीला आपल्या मिशांबरोबर आपल्या वडिलांच्या नावालाही तिलांजली देण्यात कृतार्थता वाटत होती, अशावेळी आपल्या नावाच्या आद्याक्षरांनी ओळखल्या जाणाऱ्या पुल किंवा पीएल्–त्यांतही पुल मधला 'पू' ताणलेला–साहित्यिकाने बघता बघता मराठी साहित्यातील लोकप्रियतेची परमावधी गाठली. तो मराठी वाचकांचा कंठमणी ठरला आणि नुकत्याच लिहू लागलेल्या व नव्या पिढीचे दैवत ठरला.

१९५० ते ६० या काळात पुलंची मुंबई शहरावर सत्ता चालू होती. एकंदर मराठी साहित्याच्या विलक्षण जोमाचा हा काळ होता. मराठी समाजजीवनाच्या वातावरणात नव्या–जुन्या साहित्यिकांनी एक सळसळत्या चैतन्याचे युग आणून सोडले होते. या काळातल्या कथा–कवितांनी, मराठी वाङ्मयात एक नवी नवलाई निर्माण केली होती. याच काळात मराठी ग्रामीण कथा अतिशय रंगात आली होती, प्रादेशिक कादंबरीने एक नवे आकाश गवसल्याचा आनंद दिला होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मुंबईत राहणाऱ्यांना जीवनमरणाच्या ज़िद्दीने लढवावी लागत होती. आणि 'वसंत सेने'च्या तडाख्याने मरगळलेल्या आचार्य अत्र्यांच्या लेखणीला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने संजीवनी देऊन हजार हत्तींचे बळ आणलेले होते. त्याकाळच्या आठवणी अजूनही अंगावर रोमांच उभे करतात !

त्या आठवणींमध्ये कित्येक महत्त्वाच्या आठवणी पु. ल. देशपांडे यांच्याशी निगडित आहेत. अतिशय वेगाने आकाशात सूर मारणाऱ्या आणि रंगीबेरंगी ठिणग्या आपले चित्त वेधून घेणाऱ्या दारूकामातील आकाशबाणाप्रमाणे याच काळात त्यांच्या प्रतिभेच्या विलासाने वेगाने मराठी साहित्याचे क्षितिज काबीज केले.

मला आठवते, १९५३–५४ च्या सुमाराला मुंबईत नुकत्याच निघालेल्या कीर्ति कॉलेजमध्ये ते मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते आणि 'पील् सध्या मुंबईत आहेत' एवढी एक उत्सुक कुजबुज साहित्यिकांमध्ये ऐकायला मिळत होती. त्यावेळी त्यांचे महत्त्व कळत नव्हते आणि कळण्यासारखी साहित्याच्या क्षेत्रातील जाणही नव्हती. मी नुकताच मुंबईला आलो होतो आणि अत्यंत कठीण परिस्थितीत नोकऱ्या करून शिक्षण घेण्याची धडपड करीत होतो. मुंबई मराठी संग्रहालयात काम करीत असल्याने नित्य पुस्तकांशीच घनिष्ठ संबंध येत होता. अशा वेळी त्यांच्या 'तुका म्हणे' या नाटकाचा काही विशेष बोलबाला नव्हता, परंतु त्यांच्या 'खोगीर भरती'चा मात्र खूपच बोलबाला होता. कसे तरी सामान्य स्वरूपात छापलेले हे पुस्तक चांगले उत्सुकता वाढविणारे होते. हे पुस्तक प्रसिद्ध दुर्मिळ पुस्तकांचे संग्राहक व विक्रेते पां. रा. ढमढेरे यांनी काढलेले होते, हे खूपच उशिरा लक्षात आले, ते तात्या ढमढेऱ्यांच्या उत्तरकालीन सहवासानंतर. तात्यांच्या पुस्तकांच्या मर्मज्ञतेबरोबर त्यांनी पुलंचा पहिला संग्रह काढला होता, हे वाचून तात्यांच्या बद्दलचा आदर दुणावला होता. डिसेंबर महिन्याच्या पंचवीस तारखेला पुल ज्या इचलकरंजीच्या रौप्यमहोत्सवी संमेलनाचे अध्यक्ष होते, त्या संमेलनास मी जायला निघालो होतो, तेव्हा तात्या भेटले होते. आपल्या लेखकाच्या संमेलनास येण्याची खूप इच्छा असल्याचे

यांनी बोलून दाखविले होते आणि संमेलनाहून मी परत येतो तो तात्यांच्या निधनाची वार्ता ऐकण्यासाठीच! का कोणास ठाऊक, परंतु पुल.चे पहिले पुस्तक आणि तात्या ढमढेरे यांच्याबद्दलची ही आठवण मनांत घट्ट रूतून बसली आहे!

## गुण गाईन आवडी

पीएल् कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून जेमतेम वर्षभरच राहिले असतील, नंतर ते मुंबईच्या आकाशवाणीवर अधिकारी म्हणून काम पाहू लागले. मुंबईची आकाशवाणी मराठीतल्या सर्व थरातील साहित्यिकांच्या भाषणांनी निनादू लागली. आकाशवाणीवरील श्रुतिकांना एक प्रतिष्ठा प्राप्त झाली. सुतकी स्वरातील रडक्या श्रुतिकांची जागा खळाळून हसविणाऱ्या श्रुतिकांनी घेतली. पु. ल. देशपांडे यांचा शब्द घराघरात घुमू लागला. याच काळात मीही दबकत वचकत एक श्रुतिका लिहिल्याचे आठवते. आणि अहो आश्चर्यम्, मुंबईच्या आकाशवाणीवरून ती श्रुतिका सादर केली गेली. सादरकर्ते पु. ल. देशपांडे! अंगावर मूठभर नव्हे मणभर मांस चढण्यापैकीच तो प्रकार होता. ती श्रुतिका पुन्हा पुन्हा रेडिओवर लावली गेली. अति आश्चर्याचा मोठा धक्का पुढे बसावयाचा होता. भर दुपारी ठाकूरद्वारच्या भाई जीवनजी लेनमधल्या संग्रहालयात पु. ल. देशपांडे एकदा मला शोधत आले. कुलकर्णी, कुलकर्णी या आडनावाची ओरड झाली. पोटमाळ्यावरची पुस्तके खालीवर करताना घामाघूम झालेला एक पायात वहाणा नसलेला, मळकट शर्ट, लेंग्यातला एक कुलकर्णी नावाचा बावळट मुलगा त्यांच्यासमोर उभा राहिला. त्याच्या खांद्यावर त्यांनी प्रेमाने हात ठेवला व अगत्याने म्हणाले,

'अरे हे बघ, तूच का तो कुलकर्णी?'

'होय!'

'तुझी ती श्रुतिका रेडिओवरून ऐकलीस का?'

'होय!'

'बरी वाटली का?'

'होय!'

'आता आणखी खूप अशाच श्रुतिका लिही. अशाच गमतीच्या हलक्या फुलक्या लिही. आणि माझ्याकडे आणून दे!'

'काय?' म्हणून त्यांनीच मला स्वप्नातून जागे केले तेव्हा मी भानावर आलो. 'होय' म्हटल्यावर ते केव्हा निघून गेले ते कळले नाही.

मी हा प्रसंग माझ्या अंतःकरणात खोलवर कुठे तरी जपून ठेवला आहे आणि त्यानंतर नव्या उमेदीच्या असंख्य लेखकांना या सारख्याच त्यांच्या प्रोत्साहनाने दिलेल्या दिलाशाच्या असंख्य हकीकती ऐकल्या आहेत. एखाद्या मासिक पुस्तकातून एखादी चांगली कथा, कविता वाचण्यात आली की, आजही पुल थरारून उठतात, मोठ्या प्रयत्नाने त्याचा पत्ता मिळवतात आणि कौतुकाने थबथबलेल्या आपल्या अमृतवाणीने पत्र लिहून त्याला शाबासकी देतात. पुलंच्या शाबासकीने अनेक लेखकांना आपली वाट सापडल्याचा आनंद झाला आहे आणि पहिल्या वहिल्या कृतींतून 'हा मोठा लेखक होणार आहे' म्हणून पुलंनी ज्यांना हेरले ते आज साहित्याच्या क्षेत्रात काही महत्वाची कामगिरी करीत आहेत. त्यांच्या पोटी पुलंबद्दलची उदंड अशी कृतज्ञतेची भावना आहे.

मराठीच्या क्षेत्रात हा अत्यंत दुर्मिळ असलेला गुण पुलंनी कुठून आत्मसात केला कोण जाणे. कदाचित तरुण बोरकरांची कविता ऐकून, 'बोरकर तू होड जातलो पुक्ल (बोरकर तू मोठा होणार)' म्हणून तोंडभरून सोत्कंठ आशीर्वाद देणाऱ्या आणि बोरकरांच्याच 'इतुक्या लवकर येई न मरणा' या कवितेतील 'मासळीचा स्वाद दुष्य' या उद्गारांनी, 'आब्बा अच्च गॉयकर गो हॉं (अगबाई, सच्च्या गोव्याचा ग बाई हा) असं म्हणणाऱ्या आपल्या मातामहीं-पासून आजाआजींपासून हा गुण त्यांनी घेतला असावा. 'अरे हा चांगलं लिहितो. तो सरस्वतीचा लाडका पुत्र आहे. आपण त्याची दखल घेतलीच पाहिजे' या वृत्तीने ते त्याचा पाठपुरावा करतात. लेखक, कलावंत या चिजेवर मनापासून भक्ती करण्याचा हा गुण पु. ल. देशपांडे यांनी यशाच्या अत्युच्च शिखरावर असतानासुद्धा जोपासला आहे. मराठी साहित्यिकांमध्ये दिले-घेतले याचा रूढ अर्थ 'दोन दिले दोन घेतले' असा असताना पुलंच्या कोशात मात्र तो 'प्रेम दिल्याघेतल्याचा' असावा याचे अनेकांना आश्चर्य वाटते. पुलंच्या साहित्यात झपाटण्याचा जो गुण आहे, त्याचे मर्म त्यांच्या या माणसे आत्मसात करण्याच्या वृत्तीत आहे.

त्यांनी आपल्या एका पुस्तकाला 'गुण गाईन आवडी' असे नाव दिले आहे, आणि मला वाटते,तोच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव आहे. गुणांची कदर करणे आणि पूजा करणे हाच त्यांच्या मनाचा खराखुरा धर्म आहे. गुणग्राहकतेचा एक फार मोठा संपन्न वसा त्यांच्यामध्ये वास करतो आहे. वास्तविक आजच्या धावपळीच्या, धकाधकीच्या, जीवनात तो परवडणारा, अंगी लागणारा नाही.

ते माणसांच्या, साहित्याच्या, संगीताच्या, कलेच्या प्रेमात पडतात आणि अतिशय उत्कटतेने ते प्रेम जपू पाहतात. मी विद्यार्थीदशेत, त्यांनी जयहिंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांना घेऊन बसविलेले 'अंमलदार' हे नाटक पाहिलेले आहे. त्यामध्ये ते स्वतः आणि त्यांचे धाकटे बंधू काम करीत असत. पुल हे उत्कृष्ट अभिनेते, उत्कृष्ट दिग्दर्शक हे जसे त्यातून जाणवत होते, तसेच त्यांची कोणतेही काम करीत असताना आपले सारे काही पणाला लावण्याची विलक्षण जिद्द त्यातून दिसून येत होती. त्यांचे साहित्य संघासाठी 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचे वाचन झाले त्यावेळी सुदैवाने हजर राहण्याची संधी मला मिळाली होती आणि त्याच्या तालमीही मी भक्ताच्या भूमिकेतून पाहिल्या होत्या. त्या नाटकाचे उत्कृष्ट प्रयोग नंतर मी अनेकवेळा पाहिले; परंतु का कोण जाणे पुलंचे वाचन आणि त्यांनी घेतलेल्या तालमींचाच माझ्या मनावर अधिक परिणाम आहे!

'तुझे आहे तुजपाशी'च्या आगेमागे पाचसहा वर्षांच्या काळात पुलंच्या कर्तृत्वाने अनेक शिखरे गाठली. मुंबईत प्रयोगशील रंगभूमीचा गाजावाजा चालू असता त्यांनी काही उत्कृष्ट एकांकिका लिहून प्रयोगशील रंगभूमीही अतिशय परिणामकारक रीतीने राबविता येते, हे दाखवून दिले आणि त्याही क्षेत्रात त्यांनी 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवून दिले. नव्याचे, नव्या प्रयोगांचे त्यांना खूप अगत्य आहे; परंतु नव्या नावाने नवी खुळे भलत्या प्रतिष्ठेने

कुठ वावरायला लागली तर त्यांच्यातल्या जागृत लेखकाने विनोदाच्या रूपाने त्यांचा बुरखा फाडलाच म्हणून समजावे. नवकाळातील, नवे नाटचातील, प्रयोगशील रंगभूमीतील सुजेला त्यांनी विनोदाचा रामबाण उतारा देऊन भानावर आणण्याचे कार्य वेळोवेळी केले आहे.

## नव्याची ओढ

तसे पाहिले तर त्यांना नव्याजुन्याचे, कसल्याचेच वावडे नाही. ओढ आहे ती चांगल्याची, औचित्याची आणि माणुसकीला जपण्याची. मध्यमवर्गीय जीवनाच्या संस्कारांनी आपले मराठपण जपल्याची, सातत्याने तेवत ठेवल्याची त्यांना मनोमन खात्री आहे आणि म्हणूनच अनाठायी अनादर, तुच्छ तुसडेपणा आणि जगाकडे पाहण्याचा केवळ कोरडा बुद्धिवाद हा नव्या युगाचा धर्म जपण्यासारखा आणि कौतुकाने उरी बाळगण्यासारखा आहे, असे त्यांना वाटत नाही. कारण कलेच्या क्षेत्रात अत्युच्चपदी पोचलेल्या व्यक्तींनी केलेली साधना त्यांनी पाहिली आहे आणि कलेच्या उपासकांनी अहंकारात न डुंबता ती कला पुढच्या पिढीपर्यंत संक्रांत करण्यासाठी ती घेणाऱ्या सत्पात्रिकांची कदर केली आहे, ते त्यांनी पाहिले आहे. कलावंत हा शेवटी माणूसच असतो आणि त्याच्या खासगी जीवनात डोकावल्याने दिसणारे त्याचे मानवी रूप पाहून त्याच्याबद्दलच्या समजगैरसमजांनी त्याच्यातल्या दैवी कलेला पारखे होण्याचा करंटेपणा करण्यात नुकसान त्याचे नसून आपलेच आहे, याची त्यांना जाणीव आहे. म्हणून अशा व्यक्तींचे गुणगान करताना त्या व्यक्तींबद्दलचा अतीव पूज्यभाव ते दाखवतील. त्याच्यातल्या उग्र अहंकाराचेही त्यांना कौतुक वाटेल आणि त्याच्या कलेचे चीज होत नाही म्हणून त्यांचे अंतःकरण मूक आक्रंदन करू लागेल. त्यांनी रेखाटलेल्या कलावंतांच्या महत्त्वाच्या व्यक्तिचित्रणात हे सातत्याने जाणवेल. कला ही कलावंताच्या सान्निध्यात वास करीत असल्यामुळे त्याच्या कलेबरोबरच कलावंतावरही प्रेम केले पाहिजे, ही सुजाणता पुलंच्या ठिकाणी सातत्याने वास करीत असते. म्हणूनच त्यांना झपाट्याने नाहीशी होत असलेली जुनी मध्यमवर्गीय संस्कृती, किती मोठ्या माणुसकीला आपणांस पारखे करीत असते, याची जाणीव बटाटयाच्या चाळीत द्यावीशी वाटली; परंतु याचा अर्थ ते सनातनी आहेत, असे मुळीच नव्हे. सनातन मूल्यांची पूजा करणारे त्यांचे भाववेडे मन अत्यंत सजग असल्यानेच नव्या जगाच्या सामर्थ्याचेही त्यांना भान आहे. त्यामुळे नवे जग जपण्याची, त्याला सामोरे जाण्याची, त्यातले सामर्थ्य शोधून घेण्याची त्यांची नेहमी धडपड असते. नवे केवळ नवे आहे म्हणून ते स्वीकारीत नाहीत तर त्याने माणसाकडे, कलेकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळते, नवी दृष्टी देता येते म्हणून ते त्याचा स्वीकार करीत असताना दिसतात. प्रयोगशील रंगभूमीच्या काळात वेगळ्या प्रकारच्या एकांकिका त्यांनी जशा लिहिल्या, तसेच त्यांनी अलीकडे 'तीन पैशाचा तमाशा' आधुनिक पद्धतीने परिणामकारक रीतीने सादर करण्यातही यश मिळविले. जग ही रंगभूमी आहे, याचा प्रत्यय तर त्यांचा रोजचाच; परंतु गेल्या काही वर्षांत जगाचा अनेक दिवसांचा प्रवास केल्यामुळे 'पृथ्वी गोल आहे' हाही सनातन अनुभव त्यांना कसा आला, हे त्यांच्या प्रवास वर्णनातून जाणवते. नव्या जगाची त्यांची विलक्षण ओढच त्यातून व्यक्त झाली आहे.

अगदी अलीकडे त्यांना वंगभूमीचेही असेच एक वेड लागले आहे. बंगाली भाषा, बंगाली साहित्य आणि विशेषतः रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण यांनी ते झपाटून गेलेले दिसतात आणि त्यांच्या कुठल्याही क्षेत्रातले झपाटणे मराठी संस्कृतीला सदैव संपन्न करीतच आले आहे. वंगाली साहित्याबद्दलचा आणि विशेषतः रवींद्रनाथांबद्दलचा त्यांचा ओढा हाही त्यांच्या आजोबांपासूनच– मंगेश विठ्ठल दुभाषी– घेतलेला दिसतो. त्यांच्या आजोबांनी टागोरांच्या गीतांजलीचे अभंग गीतांजलीच्या रूपाने भाषांतर केले होते. वास्तविक मुंबईच्या वास्तव्यात ते भाऊसाहेब हिऱ्यांसारख्या राजकारणी व्यक्तीच्या सान्निध्यात क्षणभर आले होते आणि मुंबई सोडून मालेगावला निघाले होते; साऱ्यांना अतिशय चुटपूट लागली होती. कुठल्या तरी ग्रहाचा तो क्षणिक प्रभाव असावा. नाही तर गांधीजी, विनोबा, जयप्रकाश यांच्या गोटात ते कुठे तरी जाऊन बसले असते तर आफतच आली असती. राज्यकर्त्यांनी त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला तरी त्या मोहाच्या ते आहारी गेले नाहीत. त्यांना रवींद्रनाथांसारख्या ईश्वराघरच्या माणसाचीच ओढ खेचून घेण्यास समर्थ ठरली, ही घटनाच अतिशय बोलकी आहे!

## प्रचंड हसवणूक

पु. ल. देशपांडे हे नाव उच्चारल्याबरोबर मराठी विनोदाला या माणसाने जे भरभरून दिले त्याची याद होते. तशी मराठी विनोदाची परंपरा संपन्न आहे, मोठी आहे, परंतु ती किती अंगांनी संपन्न होऊ शकते आणि विकसित होऊ शकते हे पाहावयाचे असेल तर एकट्या पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याकडे पाहिले तर पुरे, असे निःशंकपणे म्हणावेसे वाटते. पुलंचा विनोद म्हणजे मराठी मनाचा, मराठी संस्कृतीचा एक सप्तरंगी आरसा आहे. त्यांतून मराठी वाङ्मयाला, आचारविचाराला गेल्या शतकभरात जी सूज आली, जी शिंगे फुटली, ज्या जखमा झाल्या आणि त्यांची वेळीच दखल न घेतल्यामुळे ज्या वाहू लागल्या, त्या साऱ्यांचे भेदक चित्र आहे आणि लाफिंग गॅलरीमधल्या वेगवेगळ्या आरशात स्वतःचीच विकृत प्रतिबिंबे पाहून आपण एकदम दचकावे आणि स्वतःच स्वतःला खोटके हसावे, त्याप्रमाणे प्रचंड हसवणूक आहे. त्यात बुद्धीची विलक्षण झेप आहे, कल्पनाशक्तीचा मनोहर विलास आहे, भाषेवर विलक्षण हुकमत आहे आणि दुबळ्या माणसाच्या माणुसकीचे दर्शन आहे. खरोखर मराठी विनोद पुलंच्या हातात इतका आकर्षक, इतका प्रसन्न, इतका विविधरंगी आणि इतका भाष्यपूर्ण झाला आहे की, त्यांनी निर्माण केलेली उंची हा एक अभिमानास्पद दंडक ठरावा.

'गुण गाईन आवडी' ह्या बाण्याला मागे मी 'वसा' म्हटले. पुलंनी तो घेतला नाही, तर तो त्यांच्यात उपजतच आहे. परंतु त्यामुळे आज तर त्यांच्यासारख्या कर्तृत्ववान व्यक्तीची सातत्याने कुचंबणाच होत आहे. लेखणीचे जबरदस्त व्यसन जरी त्यांना असले तरी ते वृत्तपत्रकाराच्या बाण्याचे नाही आणि हजारोंना डुलवील, झुलवील आणि मनावरची जळमटे दूर करील असे दुर्मिळ वक्तृत्व त्यांच्याजवळ असले तरी त्याचे उठसूठ सार्वजनिक प्रदर्शन करण्याची

पान २१ वर

# निवडणुका :

## मतदारात उदासीनता नको

वा. दा. रानडे

निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्याने त्याबद्दलची अनिश्चितता दूर होऊन राजकीय पक्ष उमेदवार निवड, आघाड्या, समझोते यांच्या तयारीस लागले आहेत. पण ज्या मतदाराच्या मतांवर त्यांची सारी भिस्त त्याला काय वाटते, निवडणुकांबद्दल त्याला कितपत उत्साह आहे हा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. कारण निवडणुकीचे भवितव्य त्या प्रश्नाच्या उत्तरावर ठरणार आहे.

१९७७ चा उत्साह व वातावरण यावेळी राहिलेले नाही हे तर स्पष्टच आहे. मतदारांमध्ये एक प्रकारची वैफल्याची भावना आहे. जनता पक्षाला आपण केवढ्या अपेक्षा बाळगून निवडून दिले, पण त्याच्या नेत्यांना पुरी पाच वर्षे काही सत्ता टिकविता आली नाही. दोन वर्षातच पक्ष फुटला, सरकार गडगडले आणि देशावर पुन: निवडणुकांचा प्रसंग आला. याला मतदार जबाबदार नसून राजकीय नेते जबाबदार आहेत. आपण लोकप्रतिनिधी निवडून देतो, पण त्यांच्यावर नंतर आपले काहीच नियंत्रण रहात नाही. हीच परिस्थिती पुढे चालू राहणार असेल तर मत तरी कशाला द्यावयाचे? त्याचा काय उपयोग? परिस्थितीत त्यामुळे काय फरक पडणार आहे? असे निराशेचे विचार मतदारांच्या मनात येणे स्वाभाविक असून येत्या लोकसभा निवडणुकीत ते उदासीन राहण्याचा धोका मला दिसतो. लोकशाहीबद्दल आस्था असणाऱ्या सर्वांनी हा धोका टाळून जास्तीत जास्त मतदान कसे होईल यावर आपले प्रयत्न केंद्रित करायला हवेत.

मतदान कमी झाले तर काय घडते याचा अनुभव १९७१ च्या लोकसभा निवडणुकांनी आपणास दिलेला आहे. त्या निवडणुकांत इंदिरा गांधींनी मिळविलेल्या विजयाचा खूप गाजावाजा करण्यात आला. पण हा विजय एकूण मतदान कमी झाल्यामुळे इंदिरा गांधींना मिळू शकला या वस्तुस्थितीकडे कोणाचेच फारसे लक्ष गेले नाही. राजकीय निरीक्षकांनीही त्याकडे लक्ष वेधल्याचे फारसे दिसून आले नाही. निवडणूक निकालांचे मूल्यमापन करण्याची आपली रूढ पद्धतीच चुकीची असून त्याचा तो परिणाम आहे. निवडणूक निकाल प्रसिद्ध होतात तेव्हा कोणत्या पक्षास किती जागा मिळाल्या याचे आकडेच प्रथम ठळकपणे प्रसिद्ध होतात. सध्याच्या निवडणूकपद्धतीत जागा जिंकण्यालाच महत्व आहे. बहुसंख्य जागा ज्या पक्षाला किंवा आघाडीला मिळतात त्यांचे सरकार बनते. प्रत्यक्षात त्यांना ५० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळालेली असतात. बहुसंख्य मतदारांनी त्यांच्याविरुद्ध कौल दिलेला असतो. पण ही मते विभागली गेल्याचा फायदा त्यांना मिळतो. देशावर काँग्रेसची राजवट याच सदोष निवडणूक पद्धतीने टिकून होती. पण १९७७ मध्ये सबंध जनताच त्या पक्षाविरुद्ध उलटल्याने आतापर्यंत आधार देणारी ही पद्धतीही तिला वाचवू शकली नाही. पण जेव्हा मतदान कमी होते, निवडणुकीस अनेक पक्ष व उमेदवार उभे राहून त्यांच्यात आपसात लढती होतात, मते विभागली जातात तेव्हा त्यातल्या संघटित पक्षाला या पद्धतीचा फायदा मिळून सत्तेवर येता येते. १९६७, १९७१ व १९७७ च्या लोकसभा निवडणुकांचा या दृष्टीने तुलनात्मक अभ्यास करता येण्यासारखा आहे.

स्वातंत्र्यानंतर वीस वर्षांनी १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसला पहिला मोठा हादरा बसला. विधानसभा निवडणुकात आठ राज्यात काँग्रेसने सत्ता गमावली. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने बहुमत टिकविले पण तिच्या जागांची संख्या खूपच रोडावली. एकूण ५२१ जागांपैकी तिला २८३ जागा मिळाल्या. या पूर्वीच्या १९६२ च्या निवडणुकात काँग्रेसला ३५८ जागा मिळाल्या होत्या. म्हणजे १९६७ मध्ये ७५ जागा कमी मिळाल्या त्याचे एक महत्वाचे कारण काँग्रेसला फक्त ४० टक्के मते या निवडणुकीत मिळाली होती. १९६२ मध्ये काँग्रेसने ४४.५२ टक्के मिळविली होती. मतात ४२ टक्के घट झाल्याने काँग्रेसने ७५ जागा गमावल्या होत्या.

१९७१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने ३५२ जागा आणि ४३.६८ टक्के मते मिळवून जवळजवळ १९५२ चे यश पुन: मिळविले ते मुख्यत: तीन कारणामुळे. पहिले कारण काँग्रेसच्या मतात तीन टक्के वाढ झाली पण दोन तृतीयांश जागांचे बहुमत केवळ तेवढ्या कारणाने काँग्रेसला मिळाले असे म्हणता येणार नाही. त्याला आणखी दोन कारणांची मदत झाली. ही कारणे अधिक महत्त्वाची आहेत. या दोन कारणापैकी एक म्हणजे मतदान १९६२ पेक्षा ६ टक्क्यानी घटले. १९६७ मध्ये ते ६० टक्के होते. १९७१ मध्ये ५४ टक्के झाले. मतदान न करणारापैकी बहुसंख्य काँग्रेस विरोधी होते. ही मते काँग्रेस विरोधी उमेदवाराना मिळाली असती तर त्यांना अधिक जागा निश्चित मिळून काँग्रेसच्या जागा घटल्या असत्या. विरोधी शक्ती संघटित नव्हत्या. त्या विस्कळीत असल्याने त्यांची मते विभागली गेली व त्याचा फायदा काँग्रेसला मिळाला. काँग्रेसने १९७१ मध्ये जिंकलेल्या ३५२ जागांपैकी ९० जागा ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकलेल्या आहेत. विरोधी पक्षांनी तेथे एकजुटीने एकच उमेदवार उभा केला असता तर या जागा त्यांना निश्चित मिळाल्या असत्या.

१९७१ च्या काँग्रेस यशाची ही तीन्ही कारणे १९७७ च्या निवडणुकात दूर करण्यात आल्याने जनता पक्षाला विजय मिळविता आला. काँग्रेसची मते १९७७ मध्ये ३४ टक्क्यापर्यंत घटली. एकूण मतदान सहा टक्क्यांनी वाढले. याचा अर्थ १९७१ च्या निवडणुकीत जो मतदार उदासीन राहिला होता त्याने १९७७ मध्ये मतदान केले आणि हा मतदार मुख्यत: काँग्रेस विरोधी होता. पण केवळ मतदान वाढल्याने विरोधी पक्षाचा विजय झालाच असता असे नाही. ही मते विस्कळित पडली होती. निरनिराळ्या विरोधी पक्षात विभागली गेली असती तर त्याचा फायदा काँग्रेसलाच मिळाला असता. पण १९७१ च्या अनुभवाने विरोधी पक्ष धडा शिकले होते. त्यांनी एकत्र येऊन एकच जनता पक्ष स्थापन केला होता. डाव्या पक्षांनीही जनता पक्षाशी समझोता केला होता. त्यामुळे काँग्रेस विरोधी मते १९७७ मध्ये विभागली गेली नाहीत आणि जनता पक्षाला निर्णायक बहुमत मिळाले.

१९७७ सारखा विजय पुन: मिळविण्यासाठी तशाच पद्धतीने निवडणूक वास्तविक लढवायला हवी. त्यातला मतदारांच्या दृष्टीने महत्वाचा भाग म्हणजे जास्तीत जास्त मतदान करणे, आपले मत वाया घालवायचे नाही आणि इंदिरा काँग्रेसला ते कोणत्याही परिस्थितीत द्यावयाचे नाही हे दोन निश्चय मतदारांनी आपल्या मनाशी ठामपणे केले पाहिजेत. अजून दोन महिन्याचा अवधी आहे मत कोणाला द्यावयाचे त्याबाबत या काळात निश्चित ठरविता येईल. □

इंदिराजींच्या उशिरा–सभांचे राजकारण

# बोला, अनृत बोला!

प्रा. गोपालदत्त कुलकर्णी

नुकत्याच संपन्न झालेल्या माजी महामंत्री व कॉंग्रेस ( इं. ) च्या पक्षाध्यक्षा इंदिरा गांधींच्या दौऱ्याची फलश्रुती म्हणून निश्चेष्ट पक्षात प्राण आले किंवा महाराष्ट्रात कॉंग्रेस ( इं. ) च्या विजयाचा पाया घातला गेला किंवा आणखी काही घडले का ? तर वरीलपैकी कोणतीच गोष्ट इंदिराजींना साधल्याचे समाधान त्यांना झाल्याचे दिसत नाही. कारण कोणत्याच एका राजकीय पक्षाला येत्या मध्यावधी लोकसभा निवडणुकात बहुमताची आशा नसल्याचे हताश उद्गार त्यांनी काढले आहेत; तेव्हा शंकररावांना ( चव्हाणांना ) महाराष्ट्रात ४० जागा कॉंग्रेस ( इं. ) ला नक्की मिळतील असा साक्षात्कार झाला आहे. तो निव्वळ तथाकथित आहे. इंदिराबाई 'जनतेच्या आवाजाची मी प्रतिनिधी' आहे असे एखाद्या प्रेषिताच्या थाटात सांगत असल्या तरी त्यांना तितकासा आत्मविश्वास वाटत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. इंदिराजींनी महाराष्ट्रातील मुंबईपासून श्रीगणेशा करून मिरज, सोलापूर, पंढरपूर, परभणी (औरंगाबाद व बीड सभा रद्द झाल्याने कधी पेट्रोल संपले तर कधी पायलट मार्ग चुकले म्हणून ! ) पुणे, कोल्हापूर ( सभा रद्द– गर्दी नसल्यामुळे ) जळगाव, शिरूर, नाशिक, कोपरगाव, चिपळूण, कराड, कल्याण अशा डझनावारी सभा घेतल्या. दादा कोंडके 'विच्छा माझी पुरी करा' च्या प्रयोगात जसे स्थानिक उल्लेख करून विनोद करत त्या थाटात इंदिराजींनी मालेगावला वीणकर व उर्दू भाषा, इतरत्र वेळ पडेल त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांना तोंडी लावत दोन्ही जनता पक्ष व अरस कॉंग्रेसवर तीर मारले. जवळजवळ प्रत्येक ठिकाणी तीच एल्. पी. ( लत्ता प्रहारी ) रेकॉर्ड लावायची असल्याने काही वर्तमानपत्रांच्या बहाद्दर वार्ताहरांनी घरात टेबलाशी बसूनच रिपोर्ट लिहून पाठविल्याचे बोलले जाते, ते खरेही असावे. कारण २० कलमी कार्यक्रम व त्याचे कौतुक, आणीबाणीतील अत्याचारी अन्यायांचे संदिग्ध समर्थन, जनता व लोकदलावर बिनबुडाची टीका, स्थैर्याचे कौतुक, आपला छळ, स्त्रिया, हरिजन, बालके व अल्पसंख्याकांचे उसने समर्थन, हेलिकॉप्टर, खरे-खोटे गर्दीचे आकडे आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एक ते चार-पाच तास सभास्थानी 'उशिरा येणे या घटनाक्रमांना कमी अधिक प्रमाणात सजवून मांडले की झाला इंदिराजींच्या सभेचा रिपोर्ट ! असा एकवचनी म्हणण्यापेक्षा एकभाषणी नेता वार्ताहरांना मददगार ठरतो.

इंदिरा गांधींचा कामाचा उरक जणू दृष्ट लागण्यासारखा असल्याने की काय, त्यांच्या सभांचे आयोजन ढिसाळ-ढिलेपणाने केले जाते. कोणतीही सभा वेळेवर सुरू होऊ शकली नाही. कारण प्रत्येक सभेच्या ठिकाणी त्या उशिरा पोहोचल्या. धन्य ते कार्यकर्ते ! ६० वर्षे उलटलेल्या इंदिराजींनी काही सभा मध्यरात्र उलटल्यावर घेतल्या. काय ते संघटन ? याचे कारण असे दिसते की इंदिराजींचे बरेचसे सहकारी आतापर्यंत सत्ताधारी असल्याने त्यांना नोकरांशिवाय कामे करणे केवळ अशक्य आहे असे दिसते ! दुसरे कारण असे की, उशिरा आले की भाषण थोडक्यात आटोपले तरी चालते, कारण गोळा झालेले व केलेले पब्लिक 'बोअर' झालेले असते. तिसरी गोष्ट म्हणजे कुणी विरोधक घोषणा देण्यासाठी जमा झाले असलेच तरी त्यांचाही स्टॅमिना २–४ तास लेट झाल्यावर टिकत नाही. चौथी गोष्ट, परपीडक व्यक्तींना (सॅडीस्ट) आपल्यासाठी इतरांना तिष्ठत ठेवण्यास एक वेगळाच विपरीत आनंद वाटतो. पाचवी व सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मध्यरात्री किंवा उत्तररात्रीपर्यंत तिष्ठून तडकलेली जनता संमोहित अवस्थेत पोचल्याने तिच्यावर इंदिराजींच्या शब्दांचा असर हवा तसा घडवून आणणे सोपे जाते. पेंगुळलेल्या डोळ्यांवरचे डोकेही असेच पेंगुळलेले असते ! हिटलर अशीच रात्री १०-११ नंतर लंबीचौडी भाषणे ठोकून लोकांना 'मोहित' करत असे. श्रोत्यांचा 'डिफेन्स मेसॅनिझम' जेव्हा किमान कार्यक्षम असतो अशा वेळी आणीबाणीचे समर्थन सोपे जात असावे. हे कदाचित् खरेही नसावे, परंतु मग मिरज, नासिक, कोल्हापूर, कल्याण, चिपळूण, कराड असा सर्रास उशीर कसा काय होतो ? हॅम्लेटच्या वेडात व इंदिराजींच्या उशिरात विलक्षण शिस्त आहे, ती मजेशीर नाही, तर पद्धतशीर आहे. त्या नेहमी जागोजाग त्यांच्यावर भरलेल्या खटल्यांना तथाकथित म्हणजे खोटे म्हणतात; मात्र संजय गांधीवरील खटल्यांचा उल्लेख टाळतात. कारण त्यात संजयरावांना दोषी धरण्यात आले आहे. जनता पक्षाने नेमलेल्या खर्चिक आयोगांची चर्चा करतात, मात्र त्यांचा एकेक राज्याचा दौरा शाह कमिशनपेक्षा खर्चिक असतो, हे त्या विसरतात. राजनारायण व संजय गांधीही रा. स्व. संघाविरुद्ध शिरा ताणतात; पण बाई शिरुरला संघाविरुद्ध सबुरीची भाषा बोलतात. यशवंतरावांवर १९७७ सालच्या निवडणुकांना विरोध केल्याचा मनमाना आरोप करतात. (तो साताऱ्याला नाही, तर पुण्यात ! ) तामिळनाडूत बाईचे युती-मित्र करुणानिधी पोलिसांना चिथावतात. मोरारजींनी इंदिरा कॉंग्रेसने अहमदाबादला दंगली घडविल्याचा आरोप केला आहे त्यावर बाई गप्प राहतात. हरिजनांवर शेकडो अत्याचार व असंख्य जातीय दंगली त्यांच्या ११ वर्षांच्या कारकीर्दीत घडूनही त्या गप्प राहतात व जनता व

लोकदलावर हेत्वारोप करतात. तेव्हा बाईंनी खोटे बोलण्याचे एक न-नैतिक (अमॉरल) शास्त्र बनविले आहे व ते उशिरा सभास्थानी पोचून जनतेच्या गळी उतरविण्याचे तंत्र अवलंबिले आहे. साध्या सत्यनारायणासाठी शोलेची रेकॉर्ड लावायला लाउडस्पिकरसाठी पोलीस परवाने लागतात, या मध्यरात्रीच्या सभांना असे काही नियंत्रण नाही काय? आणीबाणीत कुणाची रात्रीबेरात्री सभा घेण्याची शहामत होती का? तरीही आताची राजवट आणीबाणी-पेक्षा वाईट हे बधीर कानांना पचवावे लागतेच! भीतीचेही एक सायकॉसिस असते. इंदिराजी स्वतःची भीती इतरांवर प्रक्षेपित करून दडपेगिरी करत आहेत. पण त्यांना द्यायला तोंड आहे कुठे इतरां-जवळ? बाईंच्या या बहादुरीचे कौतुक मनमुराद दाद देऊन करायला हवे. इंदिराजी कॉंग्रेस (इं.) पक्षाची प्रचारयंत्रणा हाताळतात व चिरंजीव संजयराव 'यंत्रणा' हाताळतात. म्हणजे राजनारायण–जगजीवनरामांशी वाटाघाटी करण्यापासून ते कोर्टात धमाल करण्या-पर्यंत! भारत देश एवढा शबल पूर्वी कधीच नसेल!

अशा वेळी विदूषकी वावदुकी करणारे नेते इंदिराजींचे आव्हान काय पेलणार? लोकशाही राजकीय पक्षांच्या जागतिक इतिहासात एक व्यक्ती म्हणजे संपूर्ण पक्ष असे समीकरण या पूर्वी कधीही नसेल. गांधीजींनी एकदा लोकमान्य टिळक सभास्थानी १०-१५ मिनिटे उशिरा आल्याबद्दल खडसावले होते. 'पुढारी–नेते जर असे उशिरा आले तर स्वातंत्र्याला येण्यास उशीर झाला तर नवल वाटायला नको!' असे गांधीजींनी म्हटले होते. इंदिरा गांधी तासन्तास उशिरा आल्या तरी लोक जागे राहतात, परंतु इंदिराजींशी ज्यांना राजकारणी लढा द्यायचा आहे, ते मात्र स्वतःच्या तत्त्वबंबाळ, अहंकारजड राजकारणात मग्नगुंग आहेत. इंदिराजी आपण भाष-णाला कितीही उशिरा या, परंतु या, मात्र पंतप्रधानकीच्या खुर्चीवर आपण 'दु रुस्त' वेळेवर याल असा आम्हाला भरवसा आहे. कारण आपल्या अनृताला अमृताची गोडी आहे, काहीबाही बोलून काहीही न करणाऱ्यांच्यापेक्षा नेमके हवे ते बोलून. मग ते खोटे का असेना. लोकांना पटू लागले आहे. मध्यरात्रीच्या भाषणांचे पहाटेच्या स्वप्नात रूपांतर करण्याची किमया तुमच्याजवळ आहे. 'फ्रीडम ॲट मिड नाईट'चा हा वेगळा अर्थ तुमच्या सभांना उशीर झाला नसता, तर आम्हाला कधीच समजला नसताही! थँक्यू इंदिराजी! □


# THE SWASTIK TEXTILE MILLS LIMITED

**Leading Processors of Cotton, Art Silk, Terene and Terene Blended Fabrics.**

Screen Printing is our speciality.

*Regd. Office :*

V. N. Purao Marg
Chembuer,
Bombay 400 071.

Tel : 523761-2-3-4

*Processing Agents :*

M/s. Yamuna Processors
535, Chandra Chowk
M. J. Market, 6th Lane
Bombay 400 002.

Tel : 310064.

लोकसभेत विरोधी पक्षनेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जनता सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला.

जॉर्ज फर्नांडिस यांनी १२ जुलैला लोकसभेत केलेल्या उत्तराच्या भाषणात चव्हाणांनी व इतर विरोधी पक्षीयांनी घेतलेल्या सर्व आक्षेपांना चोख उत्तर दिले-जनता पक्षाने २८ महिन्यात काय केले, याचा हे भाषण म्हणजे एक रोकडा पुरावाच आहे.

पुढे दोनच दिवसांनी जॉर्जने जनता पक्ष सोडला असला तरी हे भाषण काही पुसले जाऊ शकत नाही. ते मूळ इंग्रजीत आहे. येथे त्याचा शब्दशः मराठी अनुवाद दिलेला आहे.....

# जनता सरकारची २८ महिन्यातली विधायक कामगिरी

## जॉर्ज फर्नांडिस

सर, मा. विरोधी पक्ष नेत्यांनी अविश्वासाचा ठराव मांडताना म्हटले होते की, ते एक राष्ट्रीय कार्य करीत आहेत. मला हे माहीत नाही की अशी कुठली वेळ साधून मा. विरोधी पक्ष नेत्यांनी राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्याचे ठरविले. जनता पक्षाचे अपयश आणि गेल्या दोन वर्ष तीन महिने या कालावधीत जनता सरकारने निर्माण केलेली परिस्थिती याचा संदर्भ ते आपल्या 'राष्ट्रीय कर्तव्याला' देतात. त्यांनी आमच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील अपयशाची यादीच तयार केली आहे.

यश आणि अपयश या गोष्टी एका विशिष्ट पातळीवर यशस्वीतेशी निगडीत असतात यावर माझा विश्वास आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर यश आणि अपयश मोजणारी एक फूटपट्टी तुमच्याजवळ आहे. माझ्या सरकारचे यशापयश ठरविताना तुमच्याजवळ कोणती मोजपट्टी आहे? असा सवाल मला मा. विरोधी पक्षनेत्यांना विचारावासा वाटतो.

सभागृहात गडबड गोंधळ.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** ही गोष्ट त्यांना बोचणारी आहे याची मला जाणीव आहे.

अशा कुठल्या मोजपट्टीच्या आधारे ते आमच्या कार्याची चिकित्सा करून आम्हाला अपयशी ठरविणार आहेत? १९७५-७६ आणि १९७६-७७ या काळात जेव्हा आपल्याकडे आणीबाणी होती, त्यावेळी मी सुमारे वर्षभर भूमिगत होतो. याच काळात तुमच्यापैकी बहुतेकजण 'आर्थिक यशस्वितेचे गतिमान दशक' साजरे करीत होतात. ज्यांना आमचे माननीय विरोधी पक्ष नेते 'आमच्या कॅप्टन आणि आमच्या डॉक्टर' या शब्दात संबोधित होते अशा व्यक्तीने ही आणीबाणी लादलेली होती. त्यावेळी मी विरोधी पक्षात बसत होतो. चव्हाण त्यावेळी उभे राहिले आणि म्हणाले, 'आमच्या कॅप्टन आणि आमच्या डॉक्टर!' ती चौथी लोकसभा होती. त्यावेळी मला मोठाच धक्का बसला.

**श्री. यशवंतराव चव्हाण :** त्या आमच्या टीमच्या प्रमुख व कॅप्टन होत्या. त्या माझ्या कॅप्टन होत्या. त्यात काय मोठी चूक आहे? आणि आता ते सांगण्यात काय हशील आहे?

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** मला याचा आनंद होतोय की मा. विरोधी पक्ष नेत्यांनी 'गतिमान दशक' राबविणारी व्यक्ती त्यांची कॅप्टन होती, ही वस्तुस्थिती सांगितली आणि ते आमच्या कार्याची चिकित्सा गतिमान दशकाच्या संदर्भात करतील असे मी आता गृहीत धरतो.

### 'गतिमान दशक!'

'गतिमान दर्शकाचे' असे कोणते कार्य आहे की, ज्याच्या आधारे मा. विरोधी पक्ष नेते आमच्या कार्याची चिकित्सा करणार आहेत? आम्ही सत्तेवर फक्त दोन वर्षे, तीन महिने होतो. एवढ्या काळात हिमालय हलविण्याची शक्ती आमच्यात कशी येईल? आम्ही ते तसे करणेही बरोबर नव्हते.

आपण आता गतिमान दशकात साध्य केलेल्या बाबींची चर्चा करू, कारण मी असे गृहीत धरतो की, माझ्या सरकारचे यशापयश मागील सरकारच्या कार्याशी तुलना करून तपासले जाईल.

मी पाचसहा वर्षांचा किंवा आणीबाणीच्या दोन वर्षातील कार्याचा उल्लेख करीत नसून तुमच्या गतिमान दशकाच्या १० वर्षांच्या कार्याचा उल्लेख करीत आहे. माझे सरकार सत्तेवर फक्त दोन वर्ष आणि तीन महिने होते. काल इथे ज्या प्रकारच्या गोष्टी बोलल्या गेल्या त्या आठवा. कोणती परिभाषा काल वापरली गेली?

अर्थातच श्री. स्टीफन हे इंग्रजी भाषेचा उपयोग अत्यंत कुशलतेने करू शकतात. ते एका अक्षरातून स्वतःलाच मारक ठरणारे तत्त्व-

ज्ञान निर्माण करू शकतात. त्यांनी ' प्रचंड वेगाचा ' उल्लेख केला. त्यानंतर आम्ही आलो, त्याच वेगाने आम्ही निघूनही गेलो ! आणि मग काय घडले ? मी उद्धृत करतो.

' वेगाने होणारा विकास आणि वेगवान आर्थिक प्रगतीचे रूपांतर तुम्ही संपूर्णपणे पिछेहाटीत केले; तुम्ही एक पाऊल मागेच टाकले आहे. '

## तुमची आकडेवारी

माझ्याजवळ काही आकडेवारी आहे. मला हे माहीत आहे की, जेव्हा पोषक असते अशा वेळी तुम्हाला आकडेवारी आवडते. ही तुमचीच आकडेवारी आहे. कुठलेही सामान्य विधान करणे सोपे असते पण विशिष्ट विधान करणे तेवढेच अवघड असते. ' आम्ही ज्याची अपेक्षा करीत होतो ते मिळविण्यात तुम्हाला यश मिळाले नाही ' असे म्हणणे सोपे असते.

गतिमान दशकाच्या काळात तुम्ही काय केलेत ?

श्री. सी. सुब्रह्मण्यम यांनी मागणी केलीच आहे की, हे सरकार उलथून टाकून त्या जागी नव्या ' श्रेष्ठ ' सरकारची स्थापना व्हावी. या नव्या सरकारात तुम्ही तिथे बसलेले सर्वजण असणार आहात. मला हे समजून घ्यायला आवडेल की, तुम्ही कुठे सुरुवात करणार आहात ? विरोधी पक्षनेत्यांच्या नेतृत्वाखालील ' गतिमान दशका '-पासून. (मग पहा) जेव्हा तुमच्या ' कॅप्टन आणि डॉक्टर 'चे नेतृत्व अस्तित्वात आले त्यावेळी दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या २४० लाख होती. जेव्हा तुमचे ' गतिमान दशक ' संपले तेव्हा ही संख्या ४२० लाखांपर्यंत वाढली !

ही तुमची आकडेवारी आहे. तुमच्या नेत्या कॅप्टन होत्या. त्या पंतप्रधान, हुकुमशहा असून त्याहीपेक्षा नियोजन समितीच्या अध्यक्षा होत्या.

मी जेव्हा आकडेवारी देतो तेव्हा तुम्ही गोंधळाला सुरुवात करता. तुम्हाला आकडेवारी कधीपासून आवडेनाशी झाली ? आणि ही तर तुमचीच आकडेवारी आहे. माझी आकडेवारी अजून मला सांगायची आहे.

गतिमान दशकातील आणीबाणीच्या काळात कोटयवधी रुपये खर्चून लोकांना तुमच्या कार्याविषयी फसविण्यासाठी वापरलेली ही आकडेवारी आहे. तुम्ही जेव्हा सुरुवात केली तेव्हा २४० लाख लोक दारिद्र रेषेखाली होते आणि जेव्हा तुमचे ' गतिमान दशक ' संपले तेव्हा ४२० लाख लोक दारिद्रय रेषेखाली होते. हीच तर तुमची मोजपट्टी नाही ना ?

तुम्हाला, भारतीयांच्या मूलभूत गरजांकडे आपण कसे लक्ष दिले, त्यांना कसे वस्त्रांकित केले, याविषयी बोलायला हवे आहे. या देशातील गरीब लोकांची महत्त्वाची गरज अन्नाची आहे. पण गतिमान दशकात काय घडले हे तुम्हाला माहीतच आहे. आज अन्नाची उपलब्धता ६० ग्रॅम्सवरून ४२ ग्रॅम्स रोज एवढी झालेली आहे. ही तुमची गरिबांच्या रक्षणाची पद्धत आहे. हे तुमचे यशस्वी दशक ! ' गरीबी हटाओ ' अशी आरोळी ठोकणे हे सोपे असते. पण आम्ही मात्र गेल्या दोन वर्षात या संदर्भात विशेष कार्य केले आहे.

वस्त्रांबाबत तुम्ही काय केलेत ? या देशातील गरिबाला तुम्ही वस्त्रपुरवठा कसा केलात ? जेव्हा गतिमान दशकाचा प्रारंभ झाला तेव्हा सर्व साधारणपणे दर वर्षी प्रत्येकाला १५.५ मीटर कापड उपलब्ध होते. आणि या दहा वर्षांत तुम्ही ही उपलब्धता प्रत्येकी दर वर्षी ११ मीटरवर आणली !

साखरेचे उदाहरण घ्या. अर्थात तुम्ही असे म्हणाल की, गरीब लोक साखर खात नाहीत—ती फक्त श्रीमंतांसाठीच बनविली जाते.

आम्ही साखरेचे भाव खूपच खाली आणले आणि तुम्ही आजपर्यंत उत्पादन केले नसेल एवढे साखरेचे उत्पादन केले.

जेव्हा गतिमान दशक सुरू झाले तेव्हा या देशात दर माणशी साखरेचे उत्पादन सात किलो एवढे होते आणि जेव्हा हे दशक संपले तेव्हा हे दर माणशी उत्पादन सहा किलो एवढे झाले !

आणि उपलब्ध असलेल्या उत्पादनाच्या आकडेवारीवरून असे सांगता येईल की, गेल्या वर्षात आम्ही हे उत्पादन १० किलोपर्यंत वाढविले आहे.

तुम्ही या लोकांना चालू तरी कसे देत होतात ? तुम्हाला चपला, रबर आणि लेदर या संदर्भातील आकडेवारी माहिताय ? जेव्हा गतिमान दशकाची सुरुवात झाली तेव्हा तुम्ही लेदर व रबरचे ६.९ कोटी चप्पलजोड उत्पादित केले ते. अर्थात तुम्ही असे म्हणू शकाल की, गरिबांनी पायात काही घालण्याची तुम्हाला अपेक्षा नाही ! जेव्हा गतिमान दशक संपले तेव्हा ही उत्पादनसंख्या तुम्ही ५.४ कोटी जोडांवर आणली.

असे गृहित धरू की, एक व्यक्ती एक चप्पलजोड एक वर्षभर वापरते. पण जेव्हा तुमचे गतिमान दशक सुरू झाले तेव्हा ४१ कोटी लोक अनवाणी होते आणि हे दशक संपले तेव्हा ५१ कोटी लोक अनवाणी झाले !

या सर्व गोष्टी मला इथे मांडाव्या लागत आहेत, कारण तुम्ही आमच्या कार्याविषयी चर्चा करीत आहात. मी आमच्या कार्याविषयी नंतर बोलणारच आहे. श्री. वसंत साठे ! तुम्ही एक अतिशय सुंदर भाषण केले. मी तर अगदी थक्क झालो.

**श्री. वसंत साठे :** ही सारी आकडेवारी तुम्ही कुठून निर्माण केलीत ?

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** या प्रश्नाचे उत्तर देणे मला आवश्यक वाटते. ही सर्व आकडेवारी पार्लमेंटच्या वाचनालयात उपलब्ध आहे. आणि ' Decade of Achivement 1966–75 ' अशासारख्या सरकारने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातून ही आकडेवारी सापडू शकते. या पुस्तकांचे प्रदर्शन त्यावेळच्या हुकुमशहांच्या सहाय्यकांनी जनपथ हॉटेलजवळ भरविलेले होते. तुमच्या माहितीसाठी—त्यावेळी मी भूमिगत होतो आणि त्यावेळीही मी या प्रदर्शनाला भेटी देत होतो. ही आकडेवारीही माहिती आणि नभोवाणी मंत्रालयातर्फे १९७६ साली प्रसिद्ध केलेल्या ' इंडिया ' या पुस्तकातीलच आहे. ही आकडेवारी सरकारच्या मध्यवर्ती संख्याशास्त्र संस्थेने १९७६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीच्या पुस्तकातूनच घेतलेली आहे. तुम्ही ती वाचनालयातून मिळवू शकाल. मी तर तुम्हाला ' रेडिमेड ' संदर्भ देतोय.

ते (विरोधी पक्षनेते) infrastructure Pure विषयी बोलतात. श्री. सुब्रह्मण्यम आज काही बोलले, श्री. नाईकांनीही काल या संदर्भात

वक्तव्य केले. ते आज इथे कुठेच दिसत नाहीत. मला त्यांना काही गोष्टीं सांगायच्या होत्या.

'लहान ते सुंदर' आणि श्री. नाईक यांच्याकडे आता मी वळतो. श्री. नाईक याचा अर्थ समजतील. काल त्यांनी विनोद करून हसविलेल्या चरखा आणि टकळी याचाही अर्थ त्यांना समजला असावा. आपण गांधीजींकडून 'लहान ते सुंदर' हे तत्त्वज्ञान शिकलो. गांधीजींनीच आपल्याला चरखा व टकळी दिली. ते या देशाला सांगत होते की, 'करा, नाही तर मरा' आणि तेच गांधीजी महाराष्ट्रातल्या येरवडा तुरुंगात चरखा आणि टकळी घेऊनच गेले.

याच महाराष्ट्रातील पुसद गावी श्री. वसंतराव नाईक जिल्ह्याच्या राष्ट्रीय युद्ध निधीच्या अध्यक्षपदावरून ब्रिटिश आर्मीसाठी सैनिकांची भरती करत होते. त्यांना हे सारं कसं समजू शकेल ? म्हणून ते इथे विनोद करतात. आमच्या औद्योगिक धोरणांवर, कुटिरोद्योगांबद्दल आणि ज्यांना कधीच काम धंदा नव्हता अशांना तो मिळवून देण्याच्या आमच्या धोरणांवर ते विनोद करतात !

मला हे सगळंच सांगावं लागतंय' श्री. स्टीफन तुम्ही मला क्षमा कराल.

काल जेव्हा माननीय सदस्यांनी, जे गांधीजींना मानणारे आहेत आणि त्यांनी स्वातंत्र्य युद्धात सक्रीय भाग घेतलाय अशांनी काल जेव्हा श्री. नाईक चरखा आणि टकळीबद्दल बोलू लागले तेव्हा टाळ्या वाजवून त्यांना साथ दिलीत यामुळे मी काल भयंकर हादरलो.

**श्री. सौगत राय :** ते तुमच्या टकळीच्या कल्पनेविषयी विनोद करीत होते. (गडबड, गोंधळ)

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** मी माझी कल्पना स्पष्ट करीनच. तुम्ही अपुऱ्या यंत्रणेबद्दल Infrastructure संबंधी बोललात. रेल्वे, बंदरे, लोखंडाची अनुपलब्धता असे बरेच काही तुम्ही बोललात.

माजी उद्योग मंत्री श्री. सुब्रह्मण्याम् तुम्हाला काय घडलंय ते माहितच आहे.

**श्री सी. सुब्रह्मण्यम् :** तुम्हाला असलेल्या ज्ञानाएवढे ज्ञान मला आहे असा दावा मी मुळीच करीत नाही.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** धन्यवाद तुम्हाला 'गतिमान दशक' सुरू झाले तेव्हा काय घडेल हे तरी माहितच आहे. तुम्ही दरवर्षी दर माणशी ९·३ किलो लोखंडाचे उत्पादन करीत होतात. जेव्हा तुमचे गतिमान दशक संपले तेव्हा तुम्ही दर माणशी ७·८ किलो लोखंड उत्पादित करीत होतात. हे, तुमचे कार्य आणि कर्तृत्व आहे...

(गडबड.)

मला आशा आहे की या संदर्भात ते आमच्या कार्याचे परीक्षण करतील.

(गोंधळ.)

गेल्या वर्षी आमची औद्योगिक वाढ ८ टक्के एवढी होती. चालू वर्षी अनेक अडचणी निर्माण झाल्यां. मार्च, एप्रिल आणि मेमध्ये आम्हाला अनेक अडचणी आल्या आणि तरीही आम्ही वाढीचा दर ५ टक्केपर्यंत रोखू शकलो. मा. सदस्यांना मी अशी खात्री देतो की या वर्षातही आम्ही ही औद्योगिक वाढीची गती ८ टक्क्यांपर्यंत नेऊ शकू. आणि ती गती वाढविण्याचाही आम्ही प्रयत्न करू.

(गडबड.)

आम्हाला वीज पुरवठ्याचा प्रश्न भेडसावत होता. कोयनेमध्ये, जिथे ६४० मेगॅवॅट वीज रोज निर्माण केली जात असे ती निर्मिती पाण्याच्या अभावामुळे ५० मे. वॅ. पर्यंत आली. आम्हाला प. बंगालमध्येही अडचणी आल्या, पण सी. पी. एम.चे आमचे कॉमरेड मित्र त्याबाबत अधिक माहिती सांगू शकतील. आणि ते तुम्हाला असेच सांगतील की ह्या अडचणी तुमच्या कर्तृत्वामुळेच उपस्थित झालेल्या आहेत.

**श्री. ज्योतिर्मय बसू :** अर्थातच.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** आमच्यापुढे प्रश्न आहेत पण आम्ही लवकरात लवकर ते सोडविण्याचा प्रयत्न करू.

## पीक उत्पादन

काल माझ्या एका मा. सदस्य मित्रांनी चर्चेत भाग घेताना म्हटले की शेती उत्पादनाबाबत जेव्हा चांगले पीक येते तेव्हा ते पंतप्रधानांमुळे आणि जेव्हा पीकाचे उत्पादन घटते ते तेव्हा ते पावसा अभावी ! असा दृष्टिकोन आम्ही घेता कामा नये गेल्या वर्षी शेतीचे उत्पादन १२६·५ लाख टन एवढे झाले; आणि यावर्षी, शेती मालाच्या उत्पादनाने १३०·५ लाख टनांच्या विक्रमच प्रस्थापित केला आहे. आणि आम्ही त्यात अजूनही सुधारणा करू शकू असा आम्हाला विश्वास वाटतो.

एकूण तुम्हाला आकडेवारी आवडत नाही असे दिसते; पण ही आकडेवारी पहाच ! पुढील वर्षात एकूण सार्वजनिक खर्चापैकी ४३·५ टक्के एवढा खर्च ग्रामीण व शेती क्षेत्रावर केला जाणार आहे. आमची आर्थिक स्थिती आज ही अशी आहे. या क्षेत्रावरील रोख खर्च ३३,००० कोटी एवढा झाला. याचाच अर्थ असा की गेल्या तीन वर्षात या क्षेत्रावर खर्च झालेल्या रकमेच्या ही रक्कम दीडपटीने जास्त आहे ! रुपयाचे मूल्य कमी झाले आहे यात शंका नाही; पण गतिमान दशकातच फक्त हे मूल्य एकदम कमी कसे काय झाले हे आपण तरी सांगू शकाल काय ? खरं तर आपण १९४७ पासून सुरू करुया. आपले मा. विरोधी पक्ष नेते थोड्या कालावधीसाठी एकेकाळी अर्थमंत्री होते. गतिमान दशकात रुपयाचे मूल्य ५४ पैसे एवढे होते पण दहा वर्षात तुमच्या कॅप्टनच्या चतुराईमुळे हे मूल्य २५ पैशापर्यंत घसरले ! रुपयाची किंमत कमी झाली हे मला मान्य आहे. पण ३३,००० कोटी रुपये ही रक्कम तुम्ही आजपर्यंत त्या क्षेत्रात खर्च केलेल्या रकमेच्या दीडपट आहे ही वस्तुस्थितीही तुम्हाला लक्षात घेतली पाहिजे.

येत्या पाच वर्षात १·७ कोटी हेक्टर जमीन पाण्याखाली आणण्यात येईल. गेल्या दोन वर्षात ५·१ लाख हेक्टर जमीन, काही छोट्या पण सुंदर योजनाद्वारे पाण्याखाली आणण्यात आली. अन्नधान्य उत्पादन वाढीला यामुळे मदतच झाली आणि ही वाढ होतच रहाणार आहे.

प्रश्न असा आहे की तुम्ही तुमची मोजपट्टी, निकष तपासून पहाणार आहात की नाही ? जेव्हा तुम्ही आमच्या आर्थिक क्षेत्रातील कार्याविषयी बोलता तेव्हा असे म्हणता की विकासाच्या प्रचंड गतीपासून आम्ही देश मागे खेचला आहे. तुमच्या गतिमान दशकात विका-

साचा असा कोणता प्रचंड वेग होता ! हा विकासाचा वेग कसा प्रचंड (!) होता ते मला तुम्हाला सांगायचं आहे.

गतिमान दशकात दर माणशी उत्पन्न ३३१·१ रुपये एवढे होते. आणि या दहा वर्षात, तुम्ही (श्री. स्टीफन), तुमच्या कॅप्टन आणि विरोधी पक्ष नेते यांनी इतक्या वेगाने प्रगती केली की आपण दर माणशी ३३७·५ रुपये उत्पन्नापर्यंत येऊन पोहोचलो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर ही वाढ नेमकी ६·९० रुपये एवढी (प्रचंड) झाली !

(गडबड.)

**श्री. के. गोपाल** : त्या वेळची लोकसंख्या काय होती ?

**श्री. जॉर्ज फर्नांडिस** : आपण दर माणशी उत्पन्नाबाबत चर्चा करीत आहोत. आणि मला वाटतं की नियोजनात वाढत्या लोकसंख्येची काळजी घेतली जाते. पण तरीही मी तुमच्या या प्रतिशील प्रगतीची आकडेवारीच सादर करतो.

१९७१–७२ साली विकासाचा दर उणे ०·९ टक्के होता. हा दर १९७२–७३ साली उणे ३·६ टक्क्यांपर्यंत आला. आणि १९७३-७४ साली हा दर + २·९ टक्के, १९७४–७५ मध्ये उणे १ टक्का असा झाला. १९७६–७७ मध्ये आपल्याला आणीबाणीची जी गोमटीं फळे चाखायला मिळाली त्यामुळे आपल्या विकासाचा दर एकदम ०·०६ एवढा खाली आला !

१९७७–७८ या जनता राजवटीच्या पहिल्याच वर्षी हा दर ५·२ टक्क्यांपर्यंत वाढला. गेल्या वर्षी अनेक अडचणी असूनही औद्योगिक विकास दर ८ टक्के, शेती उत्पादन ३ टक्के यांच्या साह्याने आम्ही विकास दर ३·९ टक्के एवढा टिकवू शकलो. हे आमचे यश आहे.

तुम्ही, श्री. स्टीफन यांच्या म्हणण्यानुसार ही प्रगती गतिमान दशकाच्य कार्याबरोबर आणि विकासाच्या प्रचंड गतीबरोबर तोलून पहाणार आहात का ? अशी तुलना करून तुम्ही असं म्हणणार आहात का की जनता सरकारचे कार्य असमाधानकारक आहे आणि औद्योगिक व आर्थिक चित्रही फारसे आशादायक नाही ?

आज आर्थिक क्षेत्रामध्ये खूपच प्रश्न उपस्थित झालेले आहेत. अशा अडचणी असूनही आम्ही आमचे कार्य करीत आहोत. श्री. सुब्रह्मण्यम् यांनी हा विकास समतोल आहे किंवा नाही हे पहाण्याचे आवाहन पंतप्रधानांना केले आहे. हा विकास समतोल आहे. आम्ही याबाबत खरोखरच खूप कार्य केलेले आहे.

गेल्या दोन वर्षात जनता पक्षाने मिळविलेल्या यशाचा, विशेषत: आर्थिक नियोजनाबाबतच्या यशाचा, मला अभिमान आहे. आजच्या अडचणी या विकासाच्या प्रचंड गतीच्याच अडचणी जाहेत.

मा. सदस्य स्टीलच्या अडचणीविषयी बोलत आहेत. सिमेंटच्या बाबतीतही अशा अडचणी उपस्थित झालेल्या आहेत. आज जीवनावश्यक वस्तूंचा मोठया प्रमाणावर तुटवडा भासतो आहे. हा तुटवडा कसा काय निर्माण झाला ? मागील सरकारने ३·५ टक्के विकासदर राखण्यासाठी नियोजन केलेले होते. सिमेंट, स्टील आणि उद्योगधंद्याच्या कच्च्या मालाच्या वस्तूंचा विचार करता अगदी अलिकडे हा विकास दर १० ते १५ टक्के एवढा होता. आजचे वातावरण विकासाच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. मागील सरकारने शेतीउत्पादन कमी करण्याचे ठरविले होते. पण आम्ही मात्र शेती उत्पादनात चांगलीच वाढ केली.

वाहतुकीचा प्रश्न घ्या. मागील सरकारला खरं तर काहीही काळजीच नव्हती. त्यांनी बंदरांमध्ये काय गुंतवणूक केली ? मी श्री. सुब्रह्मण्यम यांना असे विचारतो की त्यांनी रेल्वेमध्ये कोणत्या प्रकारची गुंतवणूक केली ? वाहतुकीच्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूरक गोष्टींमध्ये त्यांनी काय गुंतवणूक केली ?

वाहतूक क्षेत्राच्या उत्पादनाकडे लक्ष दिलं तर असं दिसतं की गेली कित्येक वर्षे ३५००० ते ४०,००० व्यावसायिक वाहनांचे उत्पादन केले जात होते. या क्षेत्राचा विकास करण्याचे महत्वाचे कार्य आम्ही प्रथमतः हाती घेतले. गेल्या वर्षी ॲटोमोटिव्ह क्षेत्रातील उत्पादन ३५ टक्क्यांपर्यंत वाढले; १९७७–७८ मध्ये हे उत्पादन ४२ टक्क्यांपर्यंत गेले. गेल्या वर्षी आम्ही ६०,००० वाहनांचे उत्पादन केले आणि त्यांना रस्त्यावर आणले. हा वाढीचा दर आम्ही या वर्षी टिकविण्याचा प्रयत्न करीत आहोत. सुमारे ८०,००० वाहने उत्पादन करण्याचे आमचे ध्येय आहे. आजपर्यंतच्या उत्पादनापेक्षा ही संख्या दुप्पट आहे. आम्हाला हे घडवून आणायचे आहे.

आर्थिक क्षेत्राबाबत मा. सदस्यांनी केलेली विधाने फोल ठरलेली आहेत. हे त्यांनी जाहीर करावे असे मला वाटते. उत्पादन, विकास, वाढ या बाबतीतले जनता सरकारचे कार्य खरोखरीच वाखाणण्यासारखे आहे. आम्हाला आमच्या कर्तृत्वाचा अभिमान आहे.

## राजकीय प्रश्न

राजकीय क्षेत्रामध्ये आपल्याला अनेक प्रश्न भेडसावत आहेत.

आमच्या पक्षावर अलीकडे टीका केली जात आहे. आमच्या पक्षामध्येही काही अडचणी आम्हाला आहेत, हे प्रत्येकाला माहीत आहे. पण मला त्याची चर्चा या गृहात करायची इच्छा नाही. मला या गृहाला आणि देशाला याची जाणीव आहे की आम्ही सहा निरनिराळे पक्ष एक पक्षबांधणीसाठी एकत्र आलो. अडीच वर्षांपूर्वी आम्ही सहा पक्ष किंवा गट होतो. आम्ही तात्विक दृष्ट्या व विचारसरणीच्या दृष्टीने वेगळे होतो. आम्हालाही आकांक्षा होती– शंकाच नाही. ही गोष्ट आम्ही लपवून कशाला ठेवायची ? राजकीय क्षेत्रात आणि सार्वजनिक जीवनात जर आपल्याला काही आकांक्षा नसतील तर त्याला काही अर्थ राहात नाही. जर निस्वार्थीपणाची भावना ठेवून कुणी आकांक्षा बाळगू लागला तर तो सार्वजनिक जीवनात राहूच शकणार नाही. जर एखादी व्यक्ती निस्वार्थी असली, ती एकाकी असली किंवा ती व्यक्ती ग्रामीण भागात उद्योग करीत असेल तर ज्या अर्थाने राजकारणी व्यक्ती सार्वजनिक जीवनात असते त्या अर्थाने त्या व्यक्ती असणे शक्य नसते.

जर एखादी व्यक्ती आकांक्षी असली तर ती व्यक्ती, नेता देशाचे तारू जिकडे नेईल तिकडे तुमच्यासारखे लोक जातात आणि तुमच्यापैकी सर्वांनी ही गोष्ट २६ जून १९७५ रोजी मान्य केलेली आहे.

जिथे आकांक्षा आणि निस्वार्थीपणा यांचे बरोबर मिश्रण होते तिथेच आपण लोकशाहीचे राजकारण व्यवस्थितरीत्या करू शकतो.

आमचा पक्ष लोकशाहीवादी पक्ष आहे. त्यामध्ये एकमेकांच्या आकांक्षांच्या आड येणाऱ्या वेगवेगळी तात्विक बैठक असलेल्या,

निरनिराळी पार्श्वभूमी लाभलेल्या ज्येष्ठ व्यक्ती एकत्र आलेल्या आहेत. आम्हालाही काही अडचणी आहेत. मला हे वेगळेपण आणि अडचणी यांना दडवून ठेवायचे नाहीये.

एकाच प्रश्नावर आमच्या पक्षात वेगवेगळ्या भूमिका, विचार मांडले जातात, उदा. बोनसचा प्रश्न... आमच्या सन्माननीय सदस्यांनी याचा संदर्भ दिला आहे. पण मला त्यांना असं विचारायचं आहे की तुमची या प्रश्नाबाबतची भूमिका कोणती आहे ?

१९७४ मध्ये रात्री अडीच वाजता तुम्ही सीमा सुरक्षा दलाचे विमान मला अटक करण्यासाठी लखनौला पाठवता आणि पहाटे ५ वाजता मला तिहार तुरुंगात अडकवून टाकता. पण इतिहास असे सांगतो की त्यावेळी या सभागृहात स्थगन प्रस्ताव आणण्यात आला होता. ८ मे १९७४ या दिवशी रेल्वे कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आणि ९ मे रोजी या सभागृहात अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला होता, हीही वस्तुस्थिती आहे.

## दडपशाही

बोनसचा प्रश्न, कर्मचारी व त्यांच्या मागण्या याबाबतीत तुमच्या नेत्यांनी काय वक्तव्ये केलेली आहेत ती वाचनालयात जाऊन वाचावीत अशी विनंती मला मा. विरोधी सदस्यांना करावीशी वाटते. तुम्ही वृत्तपत्रांच्या आधारे, तुमचे पोलिस, मिलिटरी, आर्मी, सीमा सुरक्षा दल आणि राज्यांची दडपशाही या सर्वांनी काय केलेले आहे याची माहिती करून घेणार आहात की नाही ? मा. विरोधी पक्ष सदस्य काय बोलतात हेही तुम्ही वृत्तपत्रांच्या सहाय्याने तपासून पाहायला हवे. वृत्तपत्रातून येणारी तुमची भाषणे तुम्हीच जरा वाचून पहा !

**श्री. सी. एम. स्टीफन :** तुम्हीच हा संप उभा केलात. आता गेली अडीच वर्षे तुम्ही सत्तेवर आहात, तुम्ही त्या बाबतीत काय केलेलं आहे ?

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** त्या मुद्द्याकडे मी येणारच आहे. मला वाटले होते की मा. श्री. स्टीफन तरी काही तात्त्विक चर्चेसाठी पुढे येतील, कारण त्यांच्या भाषणात हा तात्त्विकतेचा अंश बराच असतो. मी त्यांचे भाषण १९७४ मध्ये वाचले. ज्या प्रकारची भाषणे ते देतात, ज्या प्रकारे त्यांना संप दाबून टाकायचा असतो, याची कल्पना मला आली आणि आता ते बोनसच्या मागणीला पाठिंबा देत आहेत !

**श्री. सी. एम. स्टीफन :** तुम्ही तुमची आश्वासने मागे घ्या किंवा बाहेर व्हा एवढेच मला म्हणायचे आहे.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** आम्ही आमची आश्वासने मागे घेऊ, स्टीफनजी, ती आम्ही मागे घेऊच ! पण तुमच्यापैकी प्रत्येकजण सभागृहात आणि बाहेर आमच्यामधील बोनसच्या प्रश्नाबद्दलची वेगवेगळी भूमिका, यावर घसा खरवडून बोलत असता ! मला या प्रश्नाबाबतची तुमची विश्वासार्हता आणि तुमची तळमळ तपासायची आहे. तुम्ही खरंच विश्वास ठेवण्यालायक व्यक्ती आहात? की संधिसाधू आहात ? १९७४ मध्ये तुम्ही रेल्वेचा संप दाबून टाकलात आणि आता तुम्ही विचारताय की रेल्वे कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या पूर्ण होत आहेत की नाही म्हणून ?

आमच्यामधले वैचारिक फरक आम्ही काढून टाकत आहोत. मी म्हटल्याप्रमाणे आम्ही वेगवेगळ्या प्रवाहातील लोक आहोत आणि आम्ही आमच्यातील तात्त्विक, वैयक्तिक व इतर मतभेद काढून टाकण्याच्या प्रयत्नात आहोत. याउलट तुमचं काय झालंय ते पहा. तुम्ही एक पक्ष म्हणून निवडणुकीत उतरता ! पण तुमचं संख्याबळ तरी काय आहे ? कन्याकुमारी ते जम्मू काश्मीरपर्यंतची तुमची नवी आकडेवारी काय आहे ?

**मा. सदस्य :** त्यांना माहीत नाही.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** त्यांना हे माहीत नाही, हेच तर सुब्रह्मण्यम यांना हवंय. 'जनता सरकारला उलथवून टाका आणि आम्हाला गादीवर बसवा.' तुम्हाला याच पर्यायाबाबत बोलायचे आहे ना ?

मा. विरोधी पक्ष नेते सामाजिक परिस्थितीबाबत बोलत होते. जिथे हरिजन आहेत तिथे ते अजूनही त्याच दुर्लक्षित अवस्थेत रहात आहेत हे त्यांचे शब्द मनाला हलवून टाकणारे होते.

**श्री. दिनेश भट्टाचार्य :** त्या दोघांना तुम्ही एकत्र मोजून देशावर व लोकांवर अन्याय करीत आहात.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** मी म्हटल्याप्रमाणे, मा. विरोधी पक्ष नेते हरिजनांच्या दुर्लक्षित परिस्थितीविषयी बोलत होते. तुमचे स्वतःचेच नेते काल म्हणत होते की, हरिजन अजूनही दुर्लक्षितच आहेत. खरंच ते तसे आहेत ? तुम्ही १९७१ साली हरिजनांवर झालेल्या अत्याचारांबद्दल तर बोलत नाही ना ? तुम्ही ते आठवण्याची तसदी घ्याल ?

तुमच्याच आकडेवारीनुसार हरिजनांवर झालेल्या अत्याचारांची संख्या १९७१ मध्ये २१२७, १९७२ मध्ये २३८४ आणि १९७४ च्या फक्त पहिल्या सहा महिन्यात २७५८... (गडबड) मग तुम्ही या बाबतीत का बोलताहात ?

## जनताला पर्याय ?

जनता पक्षाला अधिक चांगला पर्याय हवा असे म्हणताना तुम्ही कोणते निकष लावता ? तुम्हाला ही रेषा कुठे मारायची आहे ?

**श्री. सी. एन. स्टीफन :** तुमचा निवडणूक जाहीरनामा पहा.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** मी माझ्या जाहिरनाम्याविषयी पूर्ण अभिमानी आहे. मला याविरोधी पक्ष नेत्यांना असं सांगायचंय की आम्ही अगदी प्रयत्नपूर्वक या देशात हरिजनांना चांगली वागणूक मिळावी या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत. फक्त चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी राखीव जागा म्हणजे ते प्रयत्न नव्हेत किंवा झाडू मारणाऱ्यांसाठी नोकरीत राखीव जागा ठेवणे एवढेच हे प्रयत्न नव्हेत ! राखीव जागांच्या मागे त्यांना या देशात जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हावी असा हेतू होता. आम्ही नवी महामंडळे स्थापन करीत आहोत. त्यांना पैसे व साधने यांची उपलब्धता करून देत आहोत. आमच्या औद्योगिक धोरणांचा गाभाच ग्रामीण भागात आहे. या ठिकाणी आम्ही त्यांना सुसंधी उपलब्ध करून देत आहोत. या वर्षात आम्ही हरिजन मागासवर्गीय जाती व जमातीतील ६०,००० तरुण युवक युवतींना चटया विणण्याचे शिक्षण दिले. यावर्षी आणखी ६०,००० लोकांना आम्ही हे शिक्षण देणार आहोत. अशा प्रकारे आम्ही त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र बनविण्याच्या प्रयत्नात आहोत.

आमच्या आर्थिक धोरणाची अंमलबजावणी खादी व ग्रामोद्योग समिती, हातमाग मंडळ, हस्तकला मंडळ यांच्या द्वारे हरिजन, मागास वर्गीय आणि ग्रामीण भागातील गरीबात गरीब माणसामध्ये काही सुधारणा घडवून आणण्यासाठी होते आहे.

गेल्या वर्षी आम्ही हातमाग क्षेत्रात ११ टक्के जादा कापडाची निर्मिती केली. त्यामार्गांनी जास्तीत जास्त पैसा गरिबाच्या हातात जातो आणि वसंतराव नाईक ज्यांची स्तुती करतात अशा श्रीमंतांकडे जात नाही. हे पैसे मिळणारे लोक गरीब, मागासवर्गीय, अल्पसंख्याक आहेत.

या पार्श्वभूमीवर तुम्ही आमचे परीक्षण कोणत्या निकषांवर करणार आहात ?

## धर्म स्वातंत्र्य

तुम्ही ख्रिश्चनांबाबत बोललात. तुम्ही धर्मस्वातंत्र्य विधेयकाच्या संबंधात बोललात तुम्ही त्यावर बोललात याचा मला आनंदच होतोय आणि श्री. स्टीफन या संदर्भात बोलले ही कौतुकाची गोष्ट आहे. म. विरोधी पक्ष नेतेही या संदर्भात बोलले.

हा आणखी एक असा विषय आहे की कदाचित याबाबतीत आम्ही वेगवेगळे भाष्य करीत असू असे तुम्हाला वाटेल. उदाहरणार्थ, मंत्रिमंडळातील माझे मंत्रिमहोदय मित्र श्री. मोहन धारियांनी कोचीनमध्ये म्हणजे श्री. स्टीफन, तुमच्याच राज्यामध्ये अत्यंत निग्रहपूर्वक आपली भूमिका काही दिवसांपूर्वी मांडली, की जोपर्यंत जनतापक्षात व जनता सरकारात आपल्यासारखी माणसे आहेत तोपर्यंत धर्मस्वातंत्र्य विधेयक मंजूर होणार नाही. ते असे म्हणाले, पण तुम्ही काय केलंत ! तुम्ही एका व्यक्तीने मांडलेले हे विधेयक जनता सरकारचे किंवा जनता पक्षाचे विधेयक म्हणून आरडा ओरड केलात. हा प्रामाणिकपणा म्हणायचा का ? असे मला मा. विरोधीपक्ष नेत्यांना विचारायचे आहे.

**श्री. वसंत साठे :** पंतप्रधानांनी त्याला पाठिंबा दिला होता.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** तुम्ही पंतप्रधानांवर अन्याय करू शकत नाही, मला क्षमा करा. पंतप्रधानांनी असं कधीही म्हटलेलं नव्हतं की हे धोरण सरकारचे आहे किंवा हे सरकारचे विधेयक आहे. पंतप्रधानांनी त्यांची स्वतःची मते व्यक्त केली आणि तुम्ही त्याचा स्वार्थासाठी उपयोग करून घेत आहात.

दक्षिणपूर्व भारतीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की त्यांना चतुर्थ श्रेणी नागरिकासारखी वागणूक दिली जाते. मला मा. सदस्यांच्या माहितीसाठी काही गोष्टी सांगाव्याशा वाटतात. संरक्षण दलात असणारे प्रमुख जनरल मल्होत्रा, यांच्याबाबत त्यांचा धर्म किंवा इतर बाबी सांगाव्या लागतील असे मला वाटत नाही. हवाईदलाचे चीफ श्री. लतिफ हे मुसलमान आहेत आणि नौदलाचे प्रमुख श्री. परेरिया हे ख्रिश्चन आहेत. आपल्या मातृभूमीच्या संरक्षणाची जबाबदारी या तीन वेगवेगळ्या धर्माच्या प्रमुखावर आहे. यापेक्षा अधिक कोणता पुरावा हवा आहे ? जनता सरकारने हे केले आहे आणि म्हणूनच हे प्रथमच घडते आहे.

**श्री. वसंत साठे :** काही व्यक्तींना हे न मिळू देण्याबाबत काही दबाव आणला गेल्याची पुसटशी कल्पना तर आपण करीत नाही ना!

**श्री. जॉर्ज फर्नान्डिस :** मी सांगतो...मी श्री. साठना चांगलाच ओळखतो. तुम्ही हुशार आहात आणि तुम्हाला वाटतं की, तुम्ही नेहमी हुशारीचे प्रश्न विचारता ! आम्ही कुणालाही दूर ठेवलं नाही. तुम्ही मुस्लिमांना पाठीशी घालण्यासाठी हे म्हणत आहात. (गोंधळ) मुद्दा असा आहे की, जर जनता सरकार मुसलमानविरोधी, ख्रिश्चनविरोधी, मागासवर्गीय विरोधी असेल तर त्या सरकारने ॲड. परेरिया, चीफ मार्शल लतिफ यांना दूर करायला हवे. जर सरकारच्या निधर्मीपणाचा पुरावाच हवा असेल तर हा घ्या पुरावा !

**श्री. सी. एम. स्टीफन :** तुम्ही हे धाडस करू शकणार नाही.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** तुम्ही काय केलं आहे ते आम्हाला माहीत आहे. तुम्हाला हवेच असतील तर हवे तेवढे पुरावे आम्ही सादर करू शकू.

ते लोक विधेयकासंबंधी बोलताहेत. श्री. स्टीफन, तुम्ही मध्यप्रदेशचे विधेयक विसरलात की काय ?

**श्री. सी. एम. स्टीफन :** ज्यावेळी जनसंघाचं सरकार तिथे अस्तित्वात होतं त्यावेळचे ते विधेयक आहे...(गडबड)

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** कृपया तुमची माहिती दुरुस्त करून घ्या.

**श्री. सी. सुब्रह्मण्यम :** मी पंतप्रधानांना अशी विनंती करतो की, त्यांनी सैन्यदलांचा संबंध राजकारणाशी जोडू नये.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** विरोधी पक्षाचा संपूर्ण रोख माझ्या पक्षाला जातीयवादी ठरविण्यावर आहे. या सभागृहातील व बाहेरील विरोधकांनी माझ्या पक्षाला ख्रिश्चनविरोधी पक्ष म्हटले आहे. पण मला असं सांगायचंय की, स्वतः ख्रिश्चन आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इथे उपस्थित केला गेला. श्री. नाईक व इतरांनी असे म्हटले की, पोलीस व आर्मी यांच्यात तणाव निर्माण होण्याची भारताच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. जे घडले ते दुर्दैवी होतं खास. पण तुम्ही १९७३ साल विसरलात की काय ? उत्तरप्रदेशमधल्या घटना तुम्ही विसरला आहात ?

**श्री. सी. एम. स्टीफन :** शेवटी मुख्यमंत्र्यांना त्या प्रकरणी राजीनामाच द्यावा लागला.

**श्री. जॉर्ज फर्नांडिस :** पण मुख्यमंत्र्यांना केंद्रीय मंत्री करण्यात आले याची जाणीव तुम्हाला नाही काय श्री. स्टीफन ? तुम्ही इतिहास विसरू नका. कमीत कमी तुमची कारकीर्द तरी लक्षात ठेवा ?

आताचे विरोधी पक्ष नेते १९६७ मध्ये जेव्हा गृहमंत्री होते त्यावेळी काय घडले ? त्यावेळी सीमा सुरक्षा दलाला आपल्या जागेपासून हलविलं नव्हतं काय ? सीमा सुरक्षा दलानं त्यावेळी अश्रुधूर सोडला नव्हता का ? (गोंधळ) ज्या व्यक्तीच्या साह्याने तुम्ही ही कृती केलीत ती व्यक्ती कमांडंट जनरल श्री. रुस्तुमजी होतो ! खरं तर या ठिकाणी मी त्यांच्या कागदपत्रांच्या आधारे त्यांनाच उद्धृत करतोय...

'तो १४ एप्रिल १९६७ चा दिवस होता. आणि दिल्ली पोलिसांच्या प्रश्नाच्या संदर्भात मी त्यावेळी (चुकून) गृहसचिवांच्या खोलीत उपस्थित होतो. ज्या पोलिसांनी विरोधी कारवाया केल्या आहेत अशांना अटक करण्याचा कट 'दिल्लीचे लोक' करीत होते. गेली तीन वर्षे पोलिस त्यांच्या मागण्यांसाठी निदर्शने करीत होते पण त्यांचं कुणीच ऐकत नव्हतं. त्यांनी ठिकठिकाणी पोस्टर्स लावली,

सार्वजनिक ठिकाणी जाहीर सभा भरविल्या, एकदा तर पगार घेण्याचे नाकारले आणि सर्वात वाईट म्हणजे त्यांनी जोरजोरात घोषणा दिल्या. या सर्वामागे एकच कारण होतं...त्यांच्या युनियनला मान्यता मिळत नव्हती व त्यामुळे त्यांना सुरक्षितता लाभत नव्हती."

मग काय घडलं ? अर्थातच त्या पोलिसांनी सत्याग्रह केला. श्री. रुस्तुमजी म्हणतात.

' दुसऱ्या दिवशी सीमा सुरक्षादलाने सत्याग्रहींच्या त्या जमावाला घेरले. हे सर्व फक्त दिल्ली पोलिसांच्या संपाच्या संबंधातच घडत होते. वृत्तपत्रांनी येणाऱ्या संकटांना वाचा फोडली, सर्व प्रकारच्या आवया उठवल्या आणि शहरभर हे वृत्त पसरले. '

त्यानंतर तुम्ही दिल्लीतील ' तीन मूर्ती 'च्या जवळ अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या. त्यामध्ये तिथल्या बायका आणि मुलं यांनाही अडकवण्यात आले. एक धुराचा पडदा तिथं तयार करून त्या सत्याग्रहींना तुम्ही पकडून नेलंत.

म्हणूनच या बाबतीत मा. सदस्यांनी शांत बसणंच योग्य असं मला वाटतं. उत्तर प्रदेशच्या बाबतीत श्री. रुस्तुमजी म्हणतात.

' दुसऱ्या दिवशी सकाळी संरक्षण सचिव (श्री. गोविंद नारायण) आणि मी यांना लखनौला जाण्यास सांगितले गेले. त्या ठिकाणी गोळीबारही झालेला होता. अनेक ठिकाणी आर्मी आणि पोलिस यांच्यात गोळीबाराचे प्रसंग उद्‌भवले. बनारस, सुलतानपूर आणि कानपूर इथे तर उघड उघड युद्धच चाललं होतं. पहिल्या दिवशी मृतांची व जखमींची संख्या सुमारे १०० ते १५० होती. त्यातील काही आर्मीचेही लोक होते. आर्मीच्या लोकांनी पोलिसांवर मोठ्या प्रमाणावर हल्ले केले होते आणि त्यांच्या व पोलिसांच्या अनेक बटालियन्स उत्तर प्रदेशात आपापल्या लोकांच्या मदतीसाठी रवाना करण्यात आल्या होत्या.

श्री. सौगात रॉय, या प्रकरणी कितीजण ठार झाले हे तुम्हाला माहित असेलच. अशा प्रकारे त्या वेळी गोळीबार करण्यात आला होता ! म्हणूनच जेव्हा एखादी व्यक्ती कायदा व सुव्यवस्थेबाबत चर्चा करते तेव्हा मी असे म्हणतो की त्यावेळच्या या परिस्थितीचे भान त्यांनी ठेवावे.

या निकषांच्या आधारे तुम्ही जनता सरकारचे कार्य आणि कर्तृत्व मोजणार आहात तर ! आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि कायदा व सुव्यवस्था याबाबतीतली जनता सरकार विरुद्धची तुमची विधाने आता पूर्णपणे पोकळ ठरली आहेत.

मला हे मान्य आहे की आमच्यापुढे काही अडचणी आहेत, आम्हाला अजून कर्तृत्वशील व्हायला पाहिजे. मला हेही माहित आहे की लोकांच्या मनात जनता सरकारबद्दल खूप अपेक्षा, आकांक्षा आहेत. लोकांनी आम्हाला पाच वर्षे राज्य करण्यासाठी निवडून दिलंय त्यामुळे उरलेल्या काळात आम्ही त्यांच्या अपेक्षा पूर्ण करू शकू असा मला विश्वास वाटतो.

सभागृहाला मला असे वचन द्यायचे आहे की लोकांना दिलेल्या सर्व आश्वासनांची, वचनांची पूर्ती करणे हे आमच्या सरकारचे सर्वात महत्वाचे कार्य आहे. सव्वादोन वर्षे आम्ही पाया भक्कम करण्याचे कार्य केले आहे. आम्ही आता यापुढील वाटचालीत आम्ही दिलेली वचने पूर्ण करू.

मी अशी आशा करतो की सभागृह आणि विशेषत: विरोधी पक्ष आमची ही वचने पूर्ण करण्यासाठी आम्हाला पाठिंबा देतील.

असे म्हणून मी मा. विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या अविश्वासाच्या ठरावाला विरोध करतो व हा ठराव सभागृहाने फेटाळून लावावा अशी विनंती करतो. □



कथा

# चकवा

शशी पटवर्धन

या भागातला हा डोंगर सगळ्यात उंच. कोणीतरी मळवलेल्या पायवाटेच्या आधाराने माथ्यावर आलो. कातळावर उभे राहून खाली डोकावले. विहिरीत डोकवावे तसे-कारण इथे चोहीबाजूंनी डोंगरच डोंगर.

निळ्याजर्द आकाशघुमटाकडे पाहणारी झाडे आणि झाडी. त्यांचे हिरवेपण आपापल्या परीने. मगदुराप्रमाणे वेगळे वेगळे असले तरी इतक्या उंचीवरूनही डोळ्यांना थंडावा देणारे होते–

आकाशात ढगांचे अस्तित्व नव्हते. डोक्यावर झळाळणारे निळेजर्द आकाश आणि खाली हिरवेकच जंगल आणि यात कुठेतरी क्षुद्र कीटकासारखा मी !

ही दरी तशी अरुंदच. चित्रविचित्र आकाराचे डोंगर डोंगरावर उदंड वाढलेली झाडे. जणू झाडांनीच डोंगरांचे प्रचंड रूप घेतलेले माथ्यावरची झुडपे, उतारावर झाडे आणि दरीत वृक्ष–वेली.

या दरीत काय काय साठवलेले असेल ? किती जीवतंतू या जंगलाच्या आधाराने जगत–मरत असतील ? किती पाने हिरवा रंग उधळत असतील. किती फुले सुगंध वाऱ्यावर सोडीत असतील ? किती फळे पुढच्यांना जन्म देत असतील ?

आपण फक्त प्रश्न निर्माण करायचे. सगळे (उत्तर निसर्गाने आधीच देऊन ठेवलेले असते,

टळटळीत ऊन आहे. वारा पडला आहे. तरी शिणवटा आलेला नाही; पण उत्साहही नाही ही अवस्था कोणती ते सांगता येत नाही. काहीशी भीती; पण त्याचबरोबर खिन्नता, त्यात थोडेसे आश्चर्य आणि अगतिकता–मुख्य ती.

उन्हाचा त्रास नाही. पायात दमलेपण नाही. छातीत धपापणे नाही, इतक्या उंचीवर असल्याचा गर्व नाही. नजरेत एवढे साठवता येते आहे, याचा फुलवून टाकणारा आनंद नाही. मोठमोठ्याने गात सुटावे, हाकलावे आणि स्वतःचाच आवाज पुन्हापुन्हा ऐकत राहावा असे वाटत नाही. डोळे पाण्याने भरत नाहीत किंवा अंगावर घामही नाही. जवळ कोणी असलेच तरी बोलावेसे वाटले नव्हते. धड हसताही येत नाही. मन भरभरूनही येत नाही.

हलकेहलके, सैरभैर वाटते आहे हे मात्र खरे. वाटते हीच मनाची अवस्था असावी. कशामुळे हे असे वाटते? या हिरव्या-निळ्या स्तब्धतेमुळे, की उंचीमुळे की या खोलखोल पसरलेल्या वृक्षवल्लींमुळे ?

अचानक एक घार डावीकडेच्या कपारीतूनच झेप घेऊन हिरव्या दर्यावर तरंगू लागली. तिचे ते निःस्तब्ध राहाणे, हलकेहलके होऊन हवेत पोहत राहणे अत्यंत देखणे होते. म्हणता म्हणता ती दरीतल्या गर्द झाडीत अदृश्य झाली आणि पुन्हा पोटात पोकळी निर्माण झाल्यासारखे वाटले.

क्षणात चमकून जाणाऱ्या विजेसारखी, मघापासून पाठशिवा खेळत असलेली भावना चमकून गेली. मघापासून अस्वस्थ करणारी ती अवस्था नेमकी कोणती असावी त्याचा आता उलगडा झाला.

पोटातली पोकळी, हलके हलके वाहणे, तरंगल्याची स्पष्ट जाणीव होणे हे तर आपल्या क्षुद्रत्वाचे लक्षण.

क्षणात वाटले, द्यावे झोकून !

इतक्या तीव्रतेने वाटले वाटले; की. घारीसारखे आपण तरंगू शकू याची खात्री झाली.

आणि इथेच पुन्हा क्षुद्रपणा जाणवला. स्वतःच्या जिवाची पराकोटीची काळजी वाटली.

झोकून देणे इतके अवघड असते ?

आता आकाशाची निळाई झाकळून जाऊ लागली.

दऱ्याखोऱ्यातला सूर्यास्त जितका देखणा तितकाच करुण असतो. क्षितिजापर्यंत पोचायला सूर्याला डोंगरांमाथे वेळच देत नाहीत. समुद्रापासला निवांत डुबणारा सूर्य इथे म्हणता म्हणता झाकला जातो. तिथे समुद्र त्याला मिळतो; पण इथे डोंगर त्याला खाऊन टाकतात.

आकाशघुमटाला गर्द निळेपण येऊ लागले.

खाली गूढ होऊ लागले.

पायाखालचा कातळ उगीचच गंभीर वाटू लागला.

स्वतःला विसरल्यासारखे होऊ लागले.

आता पोटातली पोकळी भीतीने भरू लागली. हलके हलके वाटणारे अंग जड झाले आतून वेगाने हालचाली सुरू झाल्या.

इथे एकटा मी.

समोर फक्त डोंगर-झाडे-आकाश आणि त्यात भरून राहिलेली गूढ जीवघेणी शांतता

बाकी कोणी नाही.

एकटेपण ते हेच का ?

या एकटेपणातून शांतता मिळणार आहे का ?

जिथे निसर्गाच्या प्रचंडतेची, त्याच्या जगड्व्याळ स्वरूपाची जाणीव होते. तिथे एकटेपणातून शातता मिळणार नाही.

कारण नंतर फक्त उरते, त्या निसर्गातच विरून जाणे.

ते जमले नाही.

अस्ताव्यस्त, तडफडत, पळत, धडपडत, ठेचकाळत उताराला लागलो.

वस्तीवर येण्यासाठी.

मग व्हायचे तेच झाले.

चकवा.

घाबरलो. घामेजून गेलो. शेवटी रडून रडून सैरावैरा धावू लागलो.

कुठे धावणार ?

झाडे आता उंच उंच. काळवंडत जाणारे आकाश त्या झाडांच्या फांद्यांमधून आपले काळवंडलेपण जमिनीवर शिंपडत होते. पक्षी चूप होते. रातकिड्यांना जाग आली होती झाडांचे पाय काळोखाचे खांब होत होते.

सगळीकडे सारखेच. सगळेच सारखे.

कोणाकडे जायचे ?

आता सगळेच बोलावत आहेत !

कुठेही गेले तरी तेच. भीतीची तीच एक तीव्र कळ.

झाडांची इतकी गर्दी आणि त्यात एकटा, चकवा लागलेला मी.

पण खरेच एकटा का ?

या जंगलात किती तरी जीव असतीलच ना ! मग एवढे घाबरण्यासारखे, रडण्यासारखे काय आहे ?

काहीच करता येत नाही तेव्हा आहे जी स्थिती आहे त्यातला आनंद मिळवावा, त्या क्षणाच्या अस्तित्वाशी कृतज्ञ असावे.

आता चकवाच अस्तित्वात राह्यला नाही. जेव्हा आपण भरकटतो, सैरावैरा धावतो, कशाचा तरी शोध घ्यायचा प्रयत्न करतो, तेव्हा चकव्याची भीती असते. सुखाचा शोध घेताना दुःखाची भीती असते. संरक्षित घरट्याचा शोध घेताना आक्रमणाची भीती असते. सुरक्षिततेकडे जाताना सतत असुरक्षिततेची भावना घोंघावत असते.

पण आता कसलाच शोध घ्यायचा नाही, हे ठरवल्याने चुकल्याची भीती नाहीशी झाली. जे सापडणार नाही. त्याचा शोध घ्यायचा नाही हे ठरल्याने चकवेपणच संपून गेले. ज्या वस्तीच्या शोधात मघाशी चकवा लागला होता, त्या वस्तीकडे जाण्याची वाट आता शोधण्याचा प्रयत्न सोडून दिला आणि चकव्याची भयानकता संपून गेली. आता इथेच. हीच वस्ती.

सरळ पाय पसरले, डोके काळोखाच्या खांबाला टेकले. टकाटका डोळे उघडे ठेवले.

...ती घार कुठे असेल ? या गर्द जंगलात तिचेही अस्तित्व आपल्यासारखेच काळोखात बुडून गेले असेल का ?

हे न दिसणारे, पण आवाजातून आपले अस्तित्व दाखविणारे रातकिडे आपल्याला निरखीत असतील ? तसे पाह्यले तर हे पाननपान आपल्याकडे पाहाते आहे, जागे राहून निरखते आहे.

आपल्याला कोणी तरी पाहाते आहे, पण आपल्याला मात्र कोणीही दिसत नाही, ही भावना भयंकर असते. पण या वेळी तरी तसे भयंकर काहीच वाटले नाही. कारण ते पाहाणारे दिसत नसले, तरी अस्तित्वात होते हे माहिती होते.

आता आकाशातून चंदेरी रंग पाझरू लागला. उंच उंच झालेल्या त्या झाडांमधून खाली ओघळू लागला. पण जमिनीपर्यंत पोचेपर्यंत त्याचा मागमूसही राहात नव्हता.

शांत, थंड, चंदेरी रंगात झाडांचे माथे न्हात होते.

वर पाहात होतो.

मघाशी, बऱ्याच वेळापूर्वी डोंगरमाथ्यावर उभा होतो तेव्हा खाली डोकावताना विहिरीत डोकावल्यासारखे वाटले होते आणि आता तळाशी असलेल्या आपल्याकडे, ही झाडे वरून पाहात आहेत असे वाटू लागले.

गूढ, घनगंभीर शांतता, विहिरीच्या आतली थंड जाणीव.

रोज रोज इथे असेच असणार...

पावसात इथे काय चालत असेल ? ही झाडे चिप्प असतील, त्यांना कवटाळलेल्या आणि नंतर त्याच्यातल्याच एक झालेल्या वेली कडकडत असतील. पाने सळसळत असतील, फांद्या करकरत असतील. वादळवारा भणाणत असेल. शीळ घालीत सगळया रानभर हिंडत असेल. एखादे जीर्ण झाड मुळासकट उलथत असताना आर्ततेने ओरडत असेल. डोंगरावरून, कपारीतून येणारे पाणलोट खळाळत, गर्जत–कोसळत येत. उद्ध्वस्त करीत करीत खोलवर दरीत नदी-ओढयाला मिळत असतील आणि त्याचवेळी एकीकडे उद्ध्वस्त होत असतानाच इथेच आत जमिनीत कुणी तरी कणाएवढे बीज अंकुरत असेल.

आपल्या संपण्याने, असेच एखादे काही अंकुरेल काय ?

या पालापाचोळयात, झाडांच्या गर्द संभाराखाली जमिनीवर स्वतःच्या अस्तित्वाच्या खुणा संपवून या मातीतच मिसळून जाण्यासाठी तर आपल्याला मघाशी चकवा लागला होता का ?

तसे असेल तर तो चकवा नाहीच.

आपण वस्तीवरच आलो म्हणायचे ! □

पुस्तके

## फिनिक्स निवड

# Marlene

( A Biography )
Charles Higham
( Pocket Books, pages 260, Dollars 2·50 )

मी ग्रंथालय चालवून आता जवळजवळ २० वर्षे पूर्ण झाली. या वीस वर्षात वाचकांच्या आवडीनिवडीचे बरेच अनुभव मिळाले. एका गोष्टीचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. माझ्या ग्रंथालयातील काही महाराष्ट्रीय वाचक फक्त इंग्रजी तर काही फक्त मराठीच वाचतात. कधी मराठी तर कधी इंग्रजी वाचणारे वाचक फारच कमी. मला काही वेळा असाही अनुभव आला आहे की, एकदा का एखादा मराठी वाचक इंग्रजीकडे वळाला की परत तो मराठीकडे खेचला जाणे अवघडच. याच्या उलट म्हणजे एखादा इंग्रजी वाचक मराठीकडे वळून परत इंग्रजीकडे खेचला जाणे हे फार सहज होत असते, १५–२० वर्षांच्या काळात माझ्या काही काही वाचकांनी इंग्रजी भाषा अवगत असून कधीही इंग्रजी पुस्तकाला हात लावला नाही. महाराष्ट्रीयन असूनही काही वाचकांनी १५–२० वर्षात मराठी पुस्तकाला हात लावला नाही ! मराठी वाङ्मय इतके खालावत चालले आहे का असे काही वाचकांना विचारले असता त्यांनी होकारार्थी उत्तर दिले.

मी स्वतः मराठी जास्त वाचायला लागलो ते मला 'मऱ्हाटी' लिहिता यावे म्हणून. गेल्या तीन वर्षात मी इतके मराठी वाचले की सतरा वर्षांचा वचपा काढून टाकला.

'मॅरलीन, चार्ली, लोहिया या पुस्तकाविषयी ललितमध्ये झालेली चर्चा मी वाचली होती. आणि म्हणूनच ठणठणपाळानी शेवटी 'चार्ली लोहिया मार्लीन' असा शीर्षकाचा क्रम फिरवून 'मारलीन तर असे लिहून मला बुचकळयात पाडले.

'मार्लीन' पुस्तकाच्या लेखकाचे नाव पण चार्लस! या पुस्तकाचे 'मार्लीन' हे नाव वाचून मला हे ललितमधले प्रकरण आठवले. मराठी वाचून मी कधीकधी कसा संभ्रमात पडतो, याचे हे एकच उदाहरण आहे. बरे, ललितच्या ऑक्टोबरच्या अंकात कुणी एका अडवलयालकरनी ठणठणपाळच्या वरील कृत्याबद्दल त्याला थेट दादा कोंडक्यांच्या पंक्तीत नेऊन बसवले आहे. मी आतापर्यंत एकही मराठी नाटक पाहिले नाही. यामुळे अशा गोष्टी वाचून मी आणखीनच बुचकळ्यात पडतो. माधव मनोहर, पु. ल. देशपांडे व गो. नी. दांडेकर असले मोठमोठाले लोकही भांडतात असे वाचून हायसे वाटते.

बरं. मार्लीन डीट्रीच ही थोडीशी आपल्या खानोलकरच्या 'रात्र काळी घागर काळी' मधील 'लक्ष्मी' पाहिली की तिचा 'विटाळ कवटाळावा' असे वाटायचे, जवळ गेलं की जळून खाक होण्याची पाळी यायची! तिचं नांवच बघा. मार्लीन, मृदू (आता ठणठणपाळ मारलीन् म्हणेल ती गोष्ट वेगळी.) डोळ्यातील come hither look सारखे नाव. आणि नंतर लगेच डीट्रीच फटाक! एका चाबकासारखे नाव...

या मार्लीन डीट्रीचने 'ब्लू एंजल' ते 'विटनेस फॉर द प्रॉसिक्युशन' अशा कैक चित्रपटात काम केले. कित्येक कुप्रसिद्ध व सुप्रसिद्ध व्यक्तींनी तिच्यावर प्रेम केले. ॲडॉल्फ हिटलर त्यातला एक.

मार्लीन डीट्रीच दिसायला तशी मेरीलीन मनरोच्या विरुद्ध. काही स्त्रिया इतक्या कामुक दिसतात, की त्यांच्यातून रस काढून घ्यावा असे आपल्याला वाटते, अशातली मेरीलीन मनरो एक. तर काही वेगळ्या रीतीने इतक्या कामुक दिसतात की त्या आपलाच रस काढून घेतील की काय असे वाटते. डीट्रीच यातलीच एक-पातळ धनुष्याकृती भुंवयांची अंतर्मुख दिसण्यास नाजूक आणि फेमिनाईन पण आता अगदी खडक. तिच्या डोळ्यात कुणी खोल खोल पाहिले की गर्तेत जाणार असे डोळे. सिगारेटच्या धुराच्या लोटाखाली तिचे आकर्षक दोन पाय सायकलीवर बसल्यासारखे फिरले की, ऑडियन्सचे डोळेसुद्धा तसेच फिरायचे.

आणखी एक विरोधाभास बघा. डीट्रीचचा जर्मनीत 'Skeleton key' असा अर्थ होतो मास्टरकी, जिने सर्व कुलुपे उघडतात; पण मारलीने तर आपल्या मनाचे सर्व कप्पे बंद करून ठेवलेले!

तिचे रुपेरी पडद्यावरचे इमेज कधी कधी द्वैलैंगिक असे. 'मोरोक्को' मध्ये ती टाय घालून व लांब शेपटीच्या कोटात येते. एका बाईच्या ओठाचे ती कडकडून चुंबन घेते. तिच्या या क्लृप्त्या व्हल्गर वाटण्याची शक्यता असते; पण ती शक्यता ती कशी धुडकावून लावते? 'म्हणजे काय? पडद्यावरच्या गोष्टी काय सिरीयसली घ्यायच्या असतात? वा!' असे जणू ती म्हणते. बहुतांशी कुणाचेही पात्र वठवताना ती उत्कट भावना दाखवित नसे. असायचे ते एक प्रकारचे थंड व संतुलित लॉजिकल पात्र.

मार्लीन डीट्रीचचा जन्म '२७-१२-१९०१ साली झाला. ती बर्लीनर होती. म्हणजे आयुष्याबद्दल तिला कसल्याही भ्रामक कल्पना नव्हत्या. तिच्यात टीकाकाराची सूक्ष्म बुद्धी होती, सर्जनच्या स्काल्पेलसारखी पण तरीही भूमध्य समुद्राचा एखादा प्रवाह बाल्टिकमध्ये सापडावा तशी तिच्या मनाची जडण घडण गूढ होती. सिनेसृष्टीत येण्याच्या आधी मार्लीन संगीतकार होणार होती. व्हायोलीन वाजवणारी होती. परंतु एकदा तिच्या डाव्या हाताच्या तिसऱ्या बोटाला व्हायोलीन वाजवताना इजा झाली. डॉक्टरांनी तिला सांगितले की या जखमेमुळे तिचा पहिला 'कन्सर्ट' काही चांगला होणार नाही. त्यामुळे ती इतकी हताश झाली की रिचर्ड बाकच्या संगीताविषयी तिला कायम तिटकारा वाटू लागला. त्यानंतर ती अभिनेत्री बनली.

मार्लीन हे नाव तिने कसे धारण केले? तर Morie Magdalene हे दोन शब्द तिने एकमेकात टेलिस्कोप केले. Lion–Tiger पासून Ligon Tiger–Lion पासून Tigon असे शब्द असतात तसे.

मार्लीनला अपयशाची फार भीती वाटत असे. तरुणपणी भरपूर यश मिळालेली पण म्हातारपणी कुणी विचारीत नाही अशी नटी तिने पाहिली की तिच्या पोटात गोळा येई. 'माझं सुद्धा असेच होणार का?' अशी तिला भीती वाटे. परंतु मार्लीनच्या आत स्टील होते आणि शेवटपर्यंत ती पोलादाप्रमाणे कणखर राहिली. मी आधी म्हटले आहे की ती लॉजिकल, थंड होती. पण ती वहिमीसुद्धा होती. एकाच माणसात परस्परविरोधी स्वभावधर्म असणे. हे काही नवीन बऱ्याच वेळा मार्लीन आपले भविष्य टॅरट कॉर्ड, क्रिस्टल बॉल व चहाच्या पानात बघत असे. टॅरट कार्ड, गेम हा एक पत्ते खेळण्याचा जुन्यातला जुना खेळ. आता तो फारसा खेळला जात नाही. भविष्य सांगण्यासाठीच त्याचा उपयोग जास्त केला जातो.

सॉमरसेट मॉम एकदा म्हणाले होते, 'लग्न हा एक किल्ला आहे. आतील लोकांना वाटते की बाहेरचे जग सुंदर व स्वतंत्र आहे. बाहेरील लोकांना वाटते की वा आत काय रंगाची उधळण चाललीय!' लोकप्रियता हासुद्धा असाच एक किल्ला आहे का? कारण मार्लीन म्हणते की, ती जेव्हा माता झाली त्यापुढील दोन वर्षे तिने जे बालसंगोपन केले, तो काळ तिच्या आयुष्यातील सर्वात सुखी गेला. माता होणे, बालसंगोपन करणे हे साधारण सर्व सामान्य स्त्रियांच्या वाट्याला येते. पण ते जेव्हा एका लोकप्रिय नटीच्या वाट्याला येते तेव्हाच त्याची गोडी कळून यावी काय?

चार्लस हायेमनी सिनेमावर अकरा पुस्तके लिहिली आहेत. मी त्यांना कळकळीची अशी विनंती करतो की त्यानी बारसं करून बारावे लिहू नये. कारण पुस्तकात माहिती जरी भरपूर असली तरी त्यांनी शैली अगदीच सपक आहे. लिखाणात चुका असल्या, शिवीगाळ असली, अश्लीलता असली तरी हरकत नाही. पण लिखाणात एक गोष्ट अवश्य असली पाहिजे. वाचनीयता चार्लस हायेम हे एक ब्रिटिश लेखक. माझ्या अनुभवानुसार ब्रिटिश लेखकाची भाषा व शैली ही अमेरिकन लेखकापेक्षा पुष्कळच श्रेष्ठ असते. पण या पुस्तकाने शैलीबाबत माझी निराशा केली. यापेक्षा सीनेनट-नटयांवर अर्ल विल्सन व होचनर या अमेरिकन लेखकांनी लिहिलेली पुस्तके पुष्कळच श्रेष्ठ आहेत.

–जे. एन्. पोंडा

पुस्तक प्रकाशन

# एकाधिकारशाहीला विरोध करणारी भाषणे

## पु. ग. मावळंकर लिखित, 'नाही नाही त्रिवार नाही'

२ नोव्हेंबरची संध्याकाळ. टिळक स्मारक मंदिराच्या आवारातली वर्दळ वाढायला लागलेली. रमेश मंत्रींच्या सत्काराच्या कटु स्मृती चाळवतच मी आत शिरलो. पण आज वातावरण निराळं होतं. लोकसभेचे माजी खासदार पु. ग. मावळंकर यांच्या 'नाही, नाही, त्रिवार नाही' या पुस्तकाचं आज इथे प्रकाशन होणार होतं. आणीबाणीच्या काळात लोकसभेत मावळंकरांनी जी भाषणं केली होती त्या चोवीस भाषणांचा हा संग्रह होता. 'नो–सर' या इंग्रजी संग्रहावरून केलेलं हे मराठी रूपांतर होतं.

गुजरातचे मुख्यमंत्री बाबुभाई पटेल या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून येणार होते. त्याशिवाय ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे, आ. ग. प्र. प्रधान, डॉ. वि. रा. करंदीकर व हरिभाऊ जोशी हे चार वक्ते या पुस्तकावरील अभिप्राय नोंदवणार होते. त्यामुळे साहजिकच टिळक स्मारक मंदिराचं रंगमंदिर हळूहळू भरायला लागलं होतं.

सहा वाजून पाच–दहा मिनिटं झाली असतील. बाबुभाई पटेल आले. त्यांच्याबरोबर शहर जनता पक्षाचे अध्यक्ष अण्णा जोशी. बाबुभाईंनी आधी टिळक स्मारक मंदिर पाहिले व नंतर ते रंगमंदिरात आले.

पुण्यातील विश्वकर्मा प्रकाशनातर्फे मावळंकरांचं हे पुस्तक प्रकाशित होत होतं. त्यामुळे साहजिकच कार्यक्रमाचं यजमानपद 'विश्वकर्मा'च्या राजाभाऊ माटेंकडे होतं. परिचयाच्या मंडळींचा परिचय करून देण्यात वेळ न घालवता राजाभाऊंनी उपस्थितांचं स्वागत केलं. ते करत असताना मुख्यमंत्री बाबुभाई पटेल यांचं जे वैशिष्टय राजाभाऊंनी सांगितलं ते नोंद करण्यासारखं आहे. बाबुभाई या कार्यक्रमाला येणार हे जेव्हा निश्चित झालं तेव्हा श्री. मावळंकरांनी राजाभाऊंना कळवलं की बाबुभाई येणार आहेत, पण त्यांच्या परतीच्या प्रवासाचं तिकीट मात्र काढून ठेवा. अर्थात एका राज्याचा मुख्यमंत्री प्रवास करणार म्हणजे विमानानेच, असे कोणालाही वाटणं स्वाभाविक आहे. पण बाबुभाईंनी हा समज पूर्णपणे चुकीचा ठरवला होता. त्यांच्या परतीच्या प्रवासासाठी रेल्वेचं दुसऱ्या वर्गाचं तिकीट राखून ठेवायला सांगण्यात आलं होतं.

आता अशी व्यक्ती ज्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभली होती त्या कार्यक्रमाला साजेसंच कृत्य राजाभाऊंनीही केलं. या कार्यक्रमाचा जमेल तितका खर्च वाचवून तो राजाभाऊंनी मोरवी पूरग्रस्तांसाठी निधी म्हणून बाबुभाईंच्या स्वाधीन केला. याचवेळी प्रसिद्ध साहित्यिका दुर्गाबाई भागवत व पुणे शहर जनता पक्षाच्या वतीनेही पूरग्रस्तांसाठी निधी देण्यात आला.

राजाभाऊंच्या प्रास्ताविकानंतर काँग्रेसचे जुने कार्यकर्ते व 'लोकशक्ती'चे माजी संपादक हरिभाऊ जोशी बोलायला उभे राहिले—

'सध्या त्याग, कर्तृत्व, तत्त्वनिष्ठा यांचा जो अभाव दिसत आहे त्याला साहित्यिकच जबाबदार आहेत,' असा हरिभाऊंनी प्रारंभीच तमाम साहित्यिकांना एक तडाखा ठेवून दिला. अशी आणखी किती विनोदी वाक्ये ऐकायला मिळतात म्हणून मी सरसावून बसलो. पण नंतर हरिभाऊ फारसं काही बोलले नाहीत.

हरीभाऊंनंतर आ. ग. प्र. प्रधानांनी बोलायला सुरूवात केली. मावळंकरांच्या या पुस्तकात लोकमान्यांच्या अग्रलेखाप्रमाणे खडे तात्त्विक बोल आहेत असं सांगून प्रा. प्रधानांनी तात्कालिकतेच्या मर्यादा ओलांडून चिरंतनतेकडे जाण्याची मावळंकरांची ओढ पुस्तकात सूचकपणे व्यक्त झाली असल्याचं सांगितलं. डॉ. वि. रा. करंदीकरांनीही, संसदेच्या व्यासपीठावर मावळंकरांनी दिलेल्या एकाकी, सनदशीर लढयाचं चित्रण पुस्तकात आहे. असे गौरवोद्गार काढून ज्या पार्श्वभूमीवर ही भाषणं केली गेली ती जाणून घेऊन भाषणांचं मूल्य केलं पाहिजे असं सांगितलं.

त्यानंतर नानासाहेब गोरे बोलायला उभे राहिले—

मी या ठिकाणी जुनं मित्रऋण फेडायला आलो आहे. कारण मावळंकरांची ही चोवीस भाषणं म्हणजे आणीबाणीला व एकाधिकारशाहीला विरोध केलेल्या आवाजाच्या चोवीस ध्वनिमुद्रिका आहेत.

'एकाधिकारशाहीने प्रश्न सुटण्याची शक्यता नसते; पण लोकांची तोंडं मात्र गप्प होतात हा सार्वत्रिक इतिहास आहे; पण लोकशाही जर टिकवायची असेल तर लोकशाहीची मूल्यं आपल्या वैयक्तिक जीवनात रूजवणं आवश्यक आहे.

'लोकसभेतील अपक्ष सभासद म्हणून मावळंकरांनी त्यांचं स्थान अबाधित ठेवलेलं आहे; पण सबंध लोकशाहीच्या बांधणीत पक्षपद्धतीचं असलेलं महत्त्व आणि त्याविषयीची मावळंकरांची भूमिकाही त्यांनी एकदा स्पष्ट करावी असं मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो.'

नानासाहेबांनंतर बोलायला उभे राहिले बाबुभाई पटेल.

'मावळंकरांचं हे पुस्तक म्हणजे नुसता व्याख्यानांचा संग्रह नाही, तो एक ऐतिहासिक ग्रंथ आहे. कारण ज्या काळात सगळेजण नुसतं 'होय', 'होय', करत होते. त्या काळात मावळंकरांनी 'नाही, नाही' असं स्पष्टपणे बजावलं. आपल्या वक्तव्यांमधून त्यांनी राष्ट्राच्या प्रश्नांना वाचा फोडली. राष्ट्राची लोकशाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला, एक महान राष्ट्रीय कर्तव्य मावळंकरांनी पार पाडलं आहे.'

आता सगळयांचं लक्ष मावळंकरांकडे लागलं होतं. मावळंकरांचं भाषण ऐकण्याचा योग यापूर्वीही एकदा आला होता. राजाभाऊंनीच तो घडवून आणला होता. मोहन धारियांच्या 'सफर'च्या प्रकाशन समारंभाला मावळंकर प्रमुख पाहुणे होते. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या मावळंकरांची वक्तृत्व-

शैलीही अगदी निराळी आहे. त्यांचं बोलणं म्हणजे निव्वळ गप्पा मारणं असतं. सुरवात मध्य, शेवट, मुद्द्यांची सुसंगत साखळी वगैरे वक्तृत्वाच्या पारंपारिक पद्धती मावळकरांना मान्यच नसाव्यात. त्यामुळे कित्येकदा ते आता थांबणार असं वाटत असतानाच पुन्हा एखादा नवीन मुद्दा सुरू होतो; पण तरीही कंटाळा मात्र कधीच येत नाही. मावळंकर बोलायला उभे राहिले.

'बरोबर दहा महिने आणि दोन दिवसांपूर्वी याच हॉलमध्ये राजाभाऊंच्या कृपेमुळे तुम्हाला भेटण्याचा योग आला होता. मोहन धारियांच्या 'सफर'चं प्रकाशन होणार होतं. अर्थात आता ती 'सफर' कुणीकडे चालली आहे ते मला माहीत नाही.

माझ्या 'No Sir' या संग्रहाचं अहमदाबादमध्ये जेव्हा प्रकाशन झालं तेव्हाही बाबुभाईच प्रमुख पाहुणे होते आणि त्यावेळी ते म्हणाले होते– 'No Sir' is again relevant.–A time has come when we must say, with a greater force– 'No Sir'!

'कोणत्याही देशात संसदीय लोकशाहीपद्धती जर खऱ्या अर्थाने रुजवायची असेल तर त्या देशाच्या संसदेत थोडे तरी स्वच्छ चारित्र्यसंपन्न अपक्ष उमेदवार असायला हवेत, असं माझं प्रामाणिक मत आहे– 'They should not be dependant on the party system and party discipline, but should be independent enough to be dependable. मी स्वतः लोकशाही, समता, स्वातंत्र्य, निधर्मी राज्य यासाठी झगडत आहे, झगडणार आहे. माझं निवडणुकीत काय होईल याची मला चिंता नाही. कारण I have faith in God, trust in people and confidence in my own motives and integrity.

'माझा हा संग्रह इंग्रजी, हिंदी व गुजराती भाषेत प्रसिद्ध करताना मला बराच आर्थिक फटका बसणार आहे. पण मी तो फटका सोसायचं ठरवलं आहे, कारण त्यातून लोकशिक्षणाचा नफा मी मिळवणार आहे.'

मावळंकरांच्या भाषणावर श्रोते खूष होते त्यात चुरचुरीतपणा होता, खुसखुशीतपणा होता, संवादमयता तर खूपच होती आणि तरीही एक सुसंगत विचार या सगळ्याच्या तळाशी होता. म्हणून I am a citizen of a world yet to be born, हे मावळंकरांनी स्वतःहून सांगण्यापूर्वीच श्रोत्यांना ते पटलेलं होतं

–प्रतिनिधी

# आभार

**खालील व्यक्ती आणि संस्था यांनी 'माणूस' साप्ताहिक, राजहंस प्रकाशन, साप्ताहिक मुद्रण यांजकडे दिवाळीनिमित्त शुभचिंतन पत्रिका पाठवल्या. या सर्व व्यक्ती व संस्था यांचे माणूस परिवारातर्फे मनःपूर्वक आभार.**

१ : नाईक अँन्ड कं. पुणे
२ : श्री. सु. ल. सोमण, मुंबई
३ : हिंदगोवा पब्लिकेशन्स, गोवा
४ : दीनदयाळ संशोधन संस्था, पुणे
५ : ओक सनब्रेकर्स, पुणे
६ : सुलक्षणा घोलप
७ : श्याम भिडे, डोंबिवली
८ : अ. भा. विद्यार्थी परिषद.
९ : मेघना एन्टरप्रायझेस, पुणे
१० : हसमुख शहा, मुंबई
११ : कलाभुवन, पुणे
१२ : सा. साधना, अहमदाबाद
१३ : मराठी साहित्य मंडळ, बार्शी
१४ : बाबू उडुपी, उडुपी
१५ : कुलकर्णी इंजिनियरिंग असोसिएटस्, सांगली
१६ : संकेत एंटरप्रायझेस, नाशिक
१७ : एस. पी. कुलकर्णी, पनवेल
१८ : विनया खडपेकर, मुंबई
१९ : शरद जोशी, डोंबिवली
२० : रत्नाकर मतकरी, मुंबई
२१ : श्री. व सौ. अशोक चिटणीस, पेण
२२ : एस जी. अभ्यंकर, पुणे
२३ : मनोहर कुलकर्णी, नाशिक
२४ : गोपालजी ठक्कर, पुणे
२५ : विनय गुणे, संगमनेर
२६ : श्री. व सौ. सुहास बाक्रे
२७ : शांताराम पारपिल्लेवार, मुंबई
२८ : सुहासचंद्र सुरतवाला, पुणे
२९ : डॉ. अनिल वाकणकर, मुंबई
३० : डॉ. निशिकांत मिरजकर, नवी दिल्ली
३१ : डॉ. यशवंत बर्वे, नांदगाव (नाशिक)
३२ : रा. भ. गौरकर, बार्शी
३३ : पी. डी. सोहोनी, पुणे
३४ : अभिनय कला महाविद्यालय, पुणे
३५ : संकेत इलेक्ट्रिकल्स, नाशिक
३६ : श्रीधर राजगुरू, पुणे
३७ : श्री गणेश पेपर कंपनी, पुणे
३८ : अभिजित एन्टरप्रायझेस, पुणे
३९ : निको ट्रेडिंग कंपनी, पुणे
४० : मित्रा मेडिकल्स, पुणे
४१ : महाजनी ब्रदर्स, पुणे
४२ : आनंद बागलकोटे, मिरज
४३ : जे. पी. सेल्स कॉर्पोरेशन, पुणे
४४ : नांदेड न्यूज पेपर एजन्सी
४५ : दादा कोंडके, पुणे
४६ : स्टुडिओ पार्करसन, पुणे
४७ : सदानंद वि. नार्वेकर, मुंबई
४८ : नंदलाल, सतीश, राजेन्द्र अग्रवाल, मूर्तिजापूर
४९ : अशोक पाध्ये, पुणे
५० : रचना प्रॉडक्ट्स्, पुणे
५१ : आईज अॅडव्हरटाइझिंग पुणे,

## पुलदेशपांडे : पृष्ठ ५ वरून

पृष्ठ ५ वरून

वृत्ती नाही आणि सामाजिक जाणिवा तीव्र असल्या तरी समाजसेवेच्या भाकऱ्या भाजत ते बसले नाहीत. तसे जर त्यांनी करावयाचे ठरविले असते तर आजच्या पुण्याचे सार्वजनिक अध्यक्षपद दत्तो वामन पोतदारांच्या निधनापूर्वीच त्यांच्याकडे सुखेनैव चालून आले असते यात काही शंका नाही. मला असे वाटते की, त्यांच्या झोकून देण्याच्या, काव्यशास्त्रविनोदात रममाण होण्याच्या वृत्तीमुळे ते या साऱ्यांत केव्हाच हरवले असते. अर्थात असे झाले असते तर काही चुकले असते असे मुळीच नाही, कारण दत्तो वामनांच्या व्यापामुळे त्यांनी 'संसार'च हाती धरला नाही आणि लेखणीही ताकद असूनही घट्टपणे हाती धरली नाही. पु. लं. नी उलट आपल्या सर्व गुणांना काही आवश्यक बंधनांच्या कोंदणात बसवून स्वतःचे एक सावधपण आणि वेगळेपणही सिद्ध केले आणि या त्यांच्या घडणीत सौ. सुनीतावहिनींचा मोठा भाग आहे. समाजाबद्दलची कर्तव्याची धारणा आणि कलावंताच्या सान्निध्यात त्याच्या कलेच्या सर्वांगीण जपणुकीची तपश्चर्या अशी दुहेरी साधना करण्याचे भाग्य सुनीतावहिनींच्या वाट्याला आले. कलावंताच्या जीवनाला डोळस व्यवहाराची जोड मिळाल्याने सुवर्णाला सुगंध प्राप्त कसा होतो, हे पाहावयाचे असेल तर मी म्हणेन की, भाईंच्या संसाराकडे पाहावे. पुलंना 'भाई' या नावाने त्यांच्या परिवारात संबोधिले जाते. इचलकरंजी साहित्यसंमेलनापासून त्यांची जी काही थोडीबहुत जवळीक लाभली, त्यामुळे मीही नकळत त्यांना भाईच म्हणू लागलो. पुलंनी आपल्या घरगुती संबोधनाला जाहीर रूप येऊ दिले नाही, हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. ना. सी. फडके यांनी व्याख्यानाला बऱ्यापैकी मानधन मिळण्याचा आग्रह धरला, आणि त्यामुळे परिस्थिती थोडी बदलली, हे फडक्यांचे आमच्यावर मोठेच उपकार आहेत. भाईंनी आपल्या व्यवहाराची सूत्रे सुनीतावहिनींकडे देऊन त्याला आणखी एक मोठी शिस्त आणली. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' या तुकारामोक्तीप्रमाणे उभयतांनी उत्तम धन जोडले. केवळ कलेवर, वाङ्मयावर उपजीविका करता येण्यासारखी परिस्थिती नसताना ते करंटेपण त्यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने आपल्या संसारी जीवनाला येऊ दिले नाही; परंतु हे कलावंतांच्या देवदुर्लभ घामाचे धन या उभयतांनी डोळसपणाने अंधअपंगांच्या, दीनदुबळ्यांच्या झोळीत टाकून 'उदास विचारे' संसारात रममाण होण्याची जी साधना दाखविली ती मात्र मराठीच्या क्षेत्रात एकमेवाद्वितीयच.

### काटेकोरपणाचा उगम

सुनीतावहिनींच्या किंवा भाईंच्या या व्यावहारिक वृत्तीला एक फार मोठी जबाबदारीची किनार आहे, हे फारच थोड्यांच्या लक्षात आले आहे. मागे 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा पूर्वसंमती न घेता प्रयोग करणाऱ्या साऱ्या नटांना सौ. वहिनींनी नोटीस दिली होती, त्यात नानासाहेब फाटकही होते. परंतु परवानगीशिवाय बेधडक काही करण्याच्या वृत्तीला पायबंद घालण्यासाठी असा काहीसा कठोर मार्ग वहिनींना अवलंबावा लागला. (नंतर त्या सर्वांना त्यांचे त्यांचे पैसे परत दिले हे लक्षात घ्यावे.) मी 'अस्मिता महाराष्ट्राची' नावाच्या पुस्तकाला भाईंनी प्रस्तावना लिहावी अशी एक साधे कार्ड टाकून विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली व एक अत्यंत विस्तृत व महत्त्वाची प्रस्तावना लिहिली. ती उत्तम प्रकारे स्वतःच टंकलिखित करून घेतली व बारकाईने पुन्हा पुन्हा वाचून त्यात दुरुस्त्या केल्या. या प्रसंगी त्यांनी पैशाची कसलीही अपेक्षा ठेवली नव्हती. साहित्य परिषदेच्या संग्रहातून त्यांचे उतारे घेण्याचा प्रसंग आला, त्यावेळीही त्यांनी कसलीही आडकाठी घेतली नाही. अगोदर परवानगी घेतली तर त्यासाठी काही बदल, काही सूचना करता येतात. नाटकाचा प्रयोग कसाही केल्याने त्या कलाकृतीला कमीपणा येतो म्हणून सुनीतावहिनी ही दक्षता मोठ्या काटेकोरपणे घेतात. शाळेच्या पुस्तकांतून उतारा घेताना वयोगटानुसार योग्यायोग्य पाहता येते आणि खुद्द लेखकच स्वेच्छेने काही महत्त्वाचे बदल करून द्यावयाला तयार असल्याने ते उपयुक्त ठरते. परंतु या महत्त्वाच्या गोष्टी कित्येकांना कळत नाहीत आणि निष्कारण गैरसमजाला वाव मिळतो. मला तर सारखे असे वाटते की, तुकाराममहाराजांबद्दल आपले बरेच गैरसमज आहेत. त्यांचे वाङ्मयच सांगते की, ते मोठे व्यवहारचतुर, धोरणी असावेत. त्यांचे आणि भाईंचे काही नाते असावे. (अर्थात जिजाबाईंसंबंधाने काही रूढ समजुतीही त्यामुळे चुकीच्या ठरतील!)

भाईंची कलेबद्दलची जाणीव जितकी तीव्र आहे, तितकीच सामाजिक वस्तुस्थितीबद्दलचीही आहे, परंतु कलावंताने तत्कालीन सामाजिक परिस्थितीप्रमाणे स्वतःला किती झोकून द्यावे, त्याला काही दंडक पाळले पाहिजेत, ही त्यांची निरोगी भूमिका आहे. या भूमिकेमुळे सुखदु:खांच्या सर्व काळी त्यांची वृत्ती विचलित होत नाही. हे फार मोठे निरोगीपणाचे लक्षण आहे.

पुलंच्या साऱ्या आयुष्यक्रमाकडे पाहिले तर त्यांच्या आयुष्यातले प्रत्येक परिवर्तन हे त्यांच्या नव्या कर्तृत्वाचे क्षितिज ठरले आहे. त्यांची रेडिओवरची कारकीर्द, त्यांची दूरदर्शनवरील कारकीर्द, ती भरभराटीत असताना स्वतःच्या हाताने ती दूर सारण्याची ताकद, त्यांचे रंगभूमीवरील कार्य, त्यांचे एकपात्री प्रयोग, त्यांचे लेखन हा त्यांच्या कार्याचा प्रत्येक टप्पा अत्यंत संस्मरणीय आहे. त्यामुळे मराठी माणसाच्या आयुष्यात येणारे अनेक सन्मान त्यांच्याकडे सहजगत्या चालत आले आणि या सन्मानांच्या प्रसंगीच्या त्यांच्या वृत्तीमुळे ते आणखी उंच उंच होत गेले. ते पन्नासाव्या सुवर्णमहोत्सवी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले आणि ते संमेलन विलक्षण गाजले. त्याबद्दल लिहिताना मी केसरीत म्हटले होते, 'भागवतात श्रीकृष्ण साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाल्याचे म्हटले नाही. परंतु तो झाला असता तर त्याने काय काय केले असते हे पाहावयाचे झाले तर भागवतोपासकांनी इचलकरंजीला आले पाहिजे होते!' मला वाटते, हा माझा उतारा पुरेसा अर्थपूर्ण आहे.

इचलकरंजीनंतर आणीबाणीच्या काळात दुर्गाबाईंप्रमाणेच कऱ्हाडचे संमेलन गाजले ते पुलंच्यामुळे. त्याचा इतिहास हा स्वतंत्र लेखाचा मोठा विषय होईल.

आणि नंतर आणीबाणीत त्यांनी केलेले कार्य. तेही एक स्वतंत्र पर्व ठरेल.

आणि गेल्याच महिन्यात त्यांना रवींद्रभारती विद्यापीठाने डि. लिट्‌ची पदवी दिली. हा आणखी एक मानाचा तुरा. त्याला ते हजरही राहू शकले नाहीत. मी पत्र लिहून अभिनंदन केले, तेव्हा त्यांनी उलट लिहिले,

प्रिय भीमराव,

पत्र मिळाले. पदवी मिळाली वगैरे ठीक आहे. पण अशा प्रसंगी आनंद व्यक्त करणारे तुमच्यासारखे स्नेही आहेत, ही सर्वांत मोठी समाधान देणारी गोष्ट.

तुमचा
भाई

मला हे पत्र वाचता वाचता आठवला तो संग्रहालयातला प्रसंग! असे प्रसंग किती आठवावेत! □

# बादल सरकारांच्या सहा नाटिका

विनया खडपेकर

बादल सरकार हे नाव आता मराठी नाटकप्रेमी मंडळींना नवीन नाही. 'एवं इंद्रजित' 'बाकी इतिहास' ही त्यांची नाटके मराठी रंगभूमीवर गाजून गेली आहेत. त्याच बादल सरकार यांच्या सहा बंगाली नाटिका त्यांच्या कलकत्त्याच्या 'शताब्दि'ने दि. १५ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबरच्या दरम्याने छबिलदासच्या रंगमंचावर सादर केल्या.

परक्या भाषेतील कलाकृती पाहणे हा एक वेगळा अनुभव असतो. शब्दाच्या नादाकडे आणि अभिनयाकडे सारे लक्ष आपोआप केंद्रित होते. याच दोन गोष्टींच्या जोरावर दूरचित्रवाणीवरील फ्रेंच, जर्मन चित्रपट आपल्यासारख्या परक्या प्रेक्षकांना आकर्षून घेऊ शकतात. 'स्वयंवरम्'सारखा मल्याळम् चित्रपट खिळवून ठेवू शकतो. भाषा कळत नसताना कलाकृती पाहणे कित्येकदा अधिक मनोरंजक होते. परकी भाषा भारतीय असेल तर काही शब्दांचे अर्थ स्पर्शून जातात आणि एक वेगळा आनंद मिळतो. बादल सरकार यांची बंगाली नाटके बघण्यासाठी मी म्हणूनच मुद्दाम गेले होते. छबिलदासच्या रंगमंचावर अनेक मराठी नाटके पाहिली होती. त्यापेक्षा काही वेगळे पहायला मिळेल अशी अपेक्षा होती.

'गोंडी,', 'भोमा', 'बाशी खबर', 'सुखपथ्य भारतेर इतिहास', 'रूपकत्थार केलेंकरी' आणि 'हट्टमालार ओपारे' या बादल सरकार यांच्या सादर केल्या गेलेल्या सहा नाटिका. नाटकाच्या तिकिटांवर विषयाचा परिचय छापला होता. त्यामुळे नाटके समजणे इतर भाषिकांना सोपे झाले. गोंडी म्हणजे जमिनीवर काढलेले वर्तुळ. ब्रेश्तच्या 'The Caucasian chalk circle' या नाटकाचा हा अनुवाद म्हणजेच आपले मराठीतले सुप्रसिद्ध 'अजब न्याय वर्तुळाचा.' 'भोमा' ही बंगालच्या दक्षिणेतील सुंदरवनाच्या जंगलातील गोष्ट. सुमारे ऐंशी वर्षांपूर्वी या भागात काही लोकांनी जमिनीची मशागत करण्यासाठी जंगल साफ करणे सुरू केले. भोमा हा त्यांच्यातील एक लाकूडतोड्या. त्या भोमाची ही गोष्ट. याला खरे म्हणजे भोमाची गोष्ट म्हणता येत नाही. जीवनकलहात झगडताना माणसाचे रक्त थंड झाले आहे की अजूनही गरम आहे याचा शोध या कथेतून घेतला आहे. 'बाशी खबर' म्हणजे शिळ्या बातम्या. कथेतील मुख्य व्यक्ती शहरी मध्यमवर्गीय तरुण माणूस आहे. अर्थात तो शाळा, पाठ्यपुस्तके, वर्तमानपत्रे, रूढ पौराणिक कथा वगैरे सर्व दिव्यातून गेला आहे. असा मनुष्य जेव्हा संथाळ लोकांची अमानुष छळवणूक पाहतो आणि शहरातील त्यांच्या तुरळक बातम्या ऐकतो तेव्हा त्याच्या मनावर जे आघात होतात ते या नाटिकेत आहेत. 'सुखपथ्य भारतेर इतिहास' म्हणजे सुलभ भारतीय इतिहास. मात्र हे ऐतिहासिक नाटक नाही. भारतावरील ईस्ट इंडिया कंपनीच्या राज्यापासून आजपर्यंतच्या परिस्थितीचे हे धावते कथन आहे. 'रूपकत्थार केलेंकारी' ही आधुनिक जगातील नफेबाजीवरील टीका आहे. 'हट्टमालारओपारे' ही दोन चोराची कथा आहे. ते स्वतःच्या भूमिपेक्षा वेगळ्या प्रकारचे राज्य असलेली भूमी शोधण्यासाठी नदीत उडी मारतात आणि बुडतात.

आता नेहमीचाच प्रश्न—तो म्हणजे हे विषय नाटकातून प्रेक्षकापर्यंत कितपत प्रभावीपणे पोहोचले? कथानक कळत होते. काही शब्द कळत होते. परंतु पाहताना गुंगून रंगून जाणे घडत नव्हते. केवळ भाषेचे अज्ञान हे न रंगण्याचे कारण नव्हते. प्रेक्षकापर्यंत पोहोचण्याचे नाटक माध्यमाचे जे घटक असतात त्यापैकी कोणतेच घटक उचितपणे राबविले गेले नव्हते. कलाकारांचे चेहरे ढोबळमानाने राग आनंद हे भाग थोडे फार दाखवीत होते. त्यात कोणतीही सूक्ष्मता नव्हती. शब्दांची फेकही सरधोपट होती. त्यात प्रेक्षकांच्या भावनांना छेडण्याची ताकद नव्हती. नाटक सादर होत असताना कलाकारांच्या रंगमंचावरील वावरण्याला पोषाखाला एक दृश्य परिणाम असतो. या दृष्टीने 'अलवारा डाकू' हे नाटक लक्षणीय आहे. कलाकारांच्या हालचाली, वेषभूषा, पोषाखातील रंगसंगती यातून लोककथेच्या वातावरणाचा सहज प्रत्यय 'अलवरा डाकू' या नाटकात येतो. (भाषा न समजणाऱ्यांनाही) रंगमंचावरील ही परिणामकारक चित्ररचनाही (composition) बादल सरकार यांच्या नाटकात नव्हती. बादल सरकार यांच्या नाटकात दिसत होती सामुदायिक कवायतीची दृश्ये आणि पाठ केलेल्या संवादाचे शरीराच्या सांकेतिक हालचालींसह केलेले शब्दांचे उच्चारण. जे छबिलदासच्या रंगमचावर नेहमी मराठीत चालते ते बंगालीमधून चालले होते एवढेच.

सगळे मिळून ओरडत होते. 'मनुष? मनुष!' 'तिलोत्तमा हॉबे' 'मनुष्येर रक्त' 'हिरोशीमा' वगैरे वगैरे. एका बाजूला चौघेजण 'एइ पृथिवी' असे म्हणत खांद्यात खांदे घालून गरगर फिरत फिरत बाकीचे कलाकार 'बॉम्ब!' 'ॲटम बॉम्ब' 'विशाल भारत' 'सुंदर भारत' 'गंगा-शॉगर, 'शॉगरेर बन, सुंदरबन' असे शब्द उधळीत होते. (भोमा) आठदहा जण आधी नुसते भटकले. नंतर आवाज घुमवले. बी. ए. टी. बॅट, सी. ए. टी. कॅट, वगैरे बडबडले. इंग्लिश वर्तमानपत्रे हातात धरून बंगाली बातम्या, जाहिराती वाचल्यानंतर A B C D असे थेट Z पर्यंत म्हटले. एकमेकांच्या हातात घालून फेर 'द्वितीय महायुद्धो' वगैरे बडबड (बाशी खबर) — — तीन जणांनी इंग्लीशमध्ये पन्नासापर्यंत आकडे मोजले. fifty म्हणून थांबले. नंतर ईस्ट इंडिया कंपनीपर्यंत इतिहास आणला जातो. मग ब्रिटिश ध्वज पांघरून एक मुलगी येते. ती मधेच पाठ करून उभी राहते. मधे नाचते. मग ध्वज कमरेला खोचून नाचू लागते. Industrial Revolution बडबडली जाते. काहीजण लोळत तळमळू लागतात. 'शांपूर्ण ग्रामसमाज विपद्ग्रस्तो' Industrial capital changing to finance capital वगैरे बोलले जाते.

'ईस्ट इंडिया कंपनी खॉतम' असे जाहीर केले जाते. मग पोलीस व्हॅनची शिटी, महायुद्धे वगैरे. (सुरुपथ्य भारतेर इतिहास)

असली प्रायोगिक पंथी दृश्ये पाहून आता वैताग आला आहे. मनात काही प्रश्न उभे राहतात. हे फेर धरून नाचणे आणि बडबडणे यात शाळकरी पोरापेक्षा अधिक असे ही माणसे काय करतात? त्रिकोणी आकाराचे काळे बनियन वगैरेसारखे विचित्र कपडे घालून ही माणसे कोणता परिणाम साधू इच्छितात? 'रूपकत्थेर केलेंकारी' नाटकात पात्रांच्या पाठीवर 'राजा', 'मंत्री' असे लिहिलेले कापडाचे तुकडे बांधले होते. असे इतर नाटकात विशेषतः 'गोंडी' मधे का केले नाही? किंवा 'रूपकत्थेर केलेंकारी'-मधेच का केले? ही माणसे अंगातले शर्ट प्रेक्षकांसमोर कशासाठी काढतात? प्रेक्षकांसमोर सुरवातीला व्यायामप्रकार का करतात? जे पडदा ओढून करायचे ते प्रेक्षकांसमोर करून ते कलादृष्ट्या प्रेक्षकांपर्यंत काय पोहोचवू इच्छितात? नाटकाला सुरवात करण्यापूर्वी शरीर तरतरीत करण्यासाठी काही व्यायाम आसने आवश्यक असतीलही. पण ते प्रेक्षकांसमोर कशासाठी? जागेची अडचण म्हणावी तर कलाकार बाजूच्या खोलीतून, गॅलरीमार्फत प्रवेश करीत होते. नाटके उंच रंगमंचावरून खाली आणून तरी काय साधले. कलाकार पुष्कळदा जमिनीवर आडवे व्हायचे (अभिनय दृश्यात), मग लांबच्या प्रेक्षकांना न दिसून ते उभे रहायचे. म्हणजे प्रेक्षक उभे आणि कलाकार बसलेले अशी तऱ्हा– परंपरा मोडणारी!

प्रायोगिक पंथियांची एक ठरीव पद्धती आहे. कोणताही विषय ते या पद्धतीने सादर करतात. मग ही पद्धती विषयाशी सुसंगत आहे की नाही याचा विचार केलेला नसतो. कोणतेही गीत अर्थाचा विचार न करता भजनासारखेच म्हणायचे ठरवले तर अशक्य नाही. 'प्रेम तुझ्यावर करीते मी रे' सुद्धा थोडी मोडतोड करीत भजनात कोंबता येईल. राजा–राणीची लोककथा असो, अणुबॉम्बच्या संहारक शक्तीमुळे निर्माण होणारी भयग्रस्त आधुनिक समाजाची वेदना असो, मध्यमवर्गीय दबलेल्या तरुणाची गोष्ट असो प्रायोगिक पंथाचा सादर–पद्धतीचा ठाक्या एकच– समूह दृश्ये, सामूहिक शब्दोच्चार, सांकेतिक विकट हसणे, मानवी दुःखासंबंधी आवेशाने कोकलणे, यांत्रिक युगाच्या गुलामगिरीबद्दल, दलितांच्या पिळवणुकीबद्दल कंठशोष करणे, अधूनमधून शिव्या देऊन नैराश्य सांगणे, मधेच तालात नाचणे अशी ती प्रायोगिक शैली. वेळोवेळी मी त्याबद्दल लिहिलेच आहे. टपालगृहात तारेची जशी सांकेतिक भाषा असते तशी या प्रायोगिक पंथाचीही सांकेतिक शैली आहे. म्हणून तर 'अजब न्याय वर्तुळाचा' सारखे मोठे नाटक येथे (गोंडी) अवघ्या दीड तासात उरकता येते. बादल सरकार यांच्या 'एवम् इंद्रजित' बद्दल २३ ऑगस्ट १९७० च्या केसरीत श्री. प्रभाकर पाध्ये लिहितात, 'एवम् इंद्रजित' नाटकात मध्यमवर्गीय व्यक्तीच्या वाट्याला आजच्या समाजात निरर्थक जीवनच येत आहे असं दाखवायचं आहे. त्यांच्या नाटकाचा सूत्रधार जो कवी तो ही गोष्ट पुनः पुन्हा वैचारिक पद्धतीने सांगतो... अमल, विमल, कमल आणि इंद्रजित यांच्या जीवनाचे बारीक वाकी तुकडेही तो एकामागून एक भराभर मांडतो. अर्थात यात विशेष नवीन असं काही नाही. शिवाय हे तुकडे फारच तोकडे, तोटके आहेत. ते एक सखोल अशी रसवृत्ती निर्माण करीत नाहीत आणि पुनः पुन्हा त्या 'कवी'चा तो संदेश मात्र ओरडून आरडून येतो... खरी स्थिती अशी आहे की हे जे मध्यमवर्गीय जीवन बादल सरकारांनी रेखाटले आहे, त्याचे रेखाटन आणि निरूपण. कितीही तन्मय वृत्तीने त्यांनी केले असले, तरी त्यातले नाट्य त्यांना पकडता आले नाही... हे नाटक म्हणजे प्रबंध आहे अशी या नाटकावर टीका झाली ती यामुळेच. हा प्रबंधसुद्धा विचारांच्या दृष्टीने फारसा प्रतिभाशाली नाही. हा त्याचा आणखी एक दोष आहे. मी अशी कल्पना करतो की 'एवम् इंद्रजित' हे नाटक त्यांना एक सलग प्रमाथी नाट्य म्हणून भावलच नाही. मला असे वाटते की जे एक सैद्धान्तिक प्रमेय त्यांच्या डोक्यात होते त्याची टिपणेच डायरीच्या म्हणा, फुटकळ विचारांच्या म्हणा किंवा काव्याच्या म्हणा रूपात त्यांनी करून ठेवली. मग ते या टिपणाचे रूपांतर नाटकात करण्याच्या उद्योगाला लागले.'

श्री. पाध्यांचे हे मत काही अपवाद वगळता सर्व प्रायोगिकपंथी रंगभूमीलाच लागू आहे असे मला वाटते. प्रायोगिक रंगभूमीवर डायरीतल्या टिपणासारखीच त्रोटक दृश्य–टिपणे असतात. टिपणे, नेहमी जो लिहितो, त्याला स्वतःला कळण्यासाठी असतात. यांच्या नाटकाची कथा तीच आहे.

छबिलदासमधे बादल सरकार यांच्या 'शताब्दि'ची माहिती फलकावर लावली होती. त्यातील काही मुद्यांचा येथे विचार करीत आहे.

(१) "By 1972 Shatabdi. was seriously concerned with constraints of the proscenium theatre. The barriers between the performers and spectators, barriers of distance, of levels, of light and darkness were felt as limitations on communication in the 'live show' that theatre is. In November Shatabdi's new theatre 'Anganmancha' was established. It was a small flexible theatre seating 80 to 100 people where the spectators and and performers were at the same level and the relationship of acting and audiance areas could be varied from play to play."

नाटक असे स्थलदृष्ट्या प्रेक्षकांच्याजवळ ओढून आणले तर ते प्रेक्षकांचे मन काबीज करेलच हे शक्य आहे कां? टायपीस्टच्या मनाची जवळीक दूर अंतरावरच्या बायकोमुलांशी असते की अगदी जवळच्या टाइपराइटरशी? नाटक शरीराने प्रेक्षकांपासून दहा फुटावर असो पण मनाने मात्र ते एक इंचही दूर नसणे महत्त्वाचे आहे.

(२) "From 1973 Shatabdi participated in open air performances, showed the promise of developing a 'free theatre' movement. No admission fee was charged; the audiance contributed voluntary after the show. Every saturday afternoon different groups performed shows and gradually two to three thousand people began attending. Open air performances were generally held in public

parkes, slum areas of Calcutta, also villages."

रस्त्यावर नाटक पहायला लोक थांबतात यात कलावंताचे श्रेय किती, ते कसे मोजणार? डोंबाऱ्याचा किंवा माकडाचा खेळ पहायलाही लोक रस्त्यात उभे राहतात. काही सुंदर दिसले तरच लोक रस्त्यात थांबतात असे नसते. काही विचित्र दिसले तरीही लोक थांबतात. शिकलेसवरलेले, विचित्र पोषाख केलेले बाबू लोक समूह करून' एइ पृथिवी ' ' मनुष्येर रक्तवे ' असे ओरडून कोठे मैदानात घुमायला लागले तर कुतूहल चाळवून लोक बघायला थांबणारच. झोपडपट्टीत किंवा खेडेगावात लॉटरीच्या तिकिटाच्या स्टॉलपाशी काहीतरी भोंभों ओरणाऱ्या लाऊडस्पीकरकडे पहातसुद्धा लोक उभे राहतात. एखादे नाटक मोकळ्या मैदानात रंगणार नाही असे नाही. पण बादल सरकारांच्या नाटकाचा रागरंग पाहता नेहमीपेक्षा काहीतरी विचित्र दिसल्यामुळेच सामान्य लोक तिकडे खेचले जाणार असे वाटते. पैसेसुद्धा—एकाने दिले की सगळेजण थोडेफार देतील.

(३) ' Theatre in public parks to Calcutta was stopped by the police during the emergency period. Hence Shatabdi began carring out its activities in small halls, still following the principles of ' Anganmancha '

हे असे कसे झाले? प्रेक्षकांच्याजवळ येण्यासाठी उंच रंगमंचावरून खाली उतरून पार मोकळ्या मैदानात जाऊन परंपरा मोडणारे हे रंगभूमीवरचे बंडखोर वीर पोलीसच्या दंडुक्यासरशी परत प्रेक्षकांपासून दूर हॉलमधे बंद व्हावेत? ब्रिटिशांच्याकाळात खाडिलकरांनी ' कीचक वध ' लिहून लोकजागृतीचा प्रयत्न केला. टिळकांसारखा पोषाख रामशास्त्री बघायला लोक गर्दी करू लागले. त्यांची अंतःकरणे हेलावू लागली. प्रेक्षकापर्यंत पोहोचण्याची आंच कोणाला होती? नेहमी बंद नाटकगृहात नाटके करणाऱ्या त्या जुन्या मंडळींना की, मैदानात मिरविणाऱ्या पण दंडुका पाहहॉलमधे येणाऱ्या ' शताब्दीला ?'

(4) "Shatabdi increasingly believed in the importance of inexpensive theatre in a country like ours. A principle of not spending over Rs. 100/– on sets, costumes and stage props for any production was adhered to "

शताब्दि स्वतः कितीही काटकसर करो तिचा फायदा आम्हाला मिळाल्यासारखा वाटला नाही. छबिलदासमधे एरवी नाटकाचे तिकिट चार रुपये असते. ' शताब्दी 'च्या नाटकांचे मात्र पाच रुपये होते. एक सोय मात्र छान होती, दारावर वारा घ्यायचे हातातले पंखे फुकट मिळत होते. अर्थात ते नंतर परत द्यावे लागत होते. असो! पण उकडण्याचा त्रास कमी झाला.

कितीतरी तरुण मुले मुली आज मनोभावे प्रायोगिक म्हणून अवतरलेली ही बादल सरकारची रंगभूमी पूजतात. डोक्यात काही कल्पना घेऊन चिकाटीने परिश्रम करतात. ध्यासाने वेडी होताना दिसतात. तेव्हा कलेच्या संदर्भातले टॉलस्टायचे उद्‌गार आठवतात. ' लढाईतल्याप्रमाणे मानवी जीवनाचा होम कलासाहित्यासाठी सदैव होत असतो. शेकडो माणसे नृत्यात पाय कसे हलवावे, नाचवावे, उडवावे याचा अट्टाहास करतात. वाजविणारे आपली बोटे बिजलीसारखी फिरावीत म्हणून आपली जीवने देतात. दिसते ते रंगवायला चित्रकार मरतो. नादमधुर योग्य शब्द पडावा म्हणून कवी आटापीटा करतो. हे सारे हुषार, उपयुक्त असा श्रमभार घ्यायला लायक असतात. परंतु आपापल्या धंद्याची पूजा करून अहंकारी, आंधळे होतात. त्यांचा सर्वांगीण विकास होत नाही. आपल्याच ऐटीत, जीवनाच्या गंभीर व महत्त्वाच्या बाबतीत ते उदासीन राहतात. ते जणु रानटी बनतात. त्यांची वाढ खुंटते. मानवी जीवनाचा विकास खुंटतो. सहृदयता मारली जाते. याहूनही अनिष्ट व भयंकर प्रकार कलापूजेच्या नांवाखाली चालू असतात. ज्या कलेसाठी हे सारे होत आहे ती कला दिवसेंदिवस काहीतरी अस्पष्ट, संदिग्ध अशी वस्तु होत आहे. मनुष्याच्या बुद्धीला व हृदयाला अगम्य असे तिचे स्वरूप होत आहे. समाजाने, कलेचे नाव घेऊन जे जे उभे राहते, ते खरोखर कला आहे की नाही हे नीट पाहिले पाहिजे."

☐


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १) | आम्ही पाहिलेला चीन–(चीनचे प्रवास वर्णन)–कुसुम नारगोलकर | रु. २०/– |
| २) | बळी–(कादंबरी)–श्रीकांत सिनकर | रु. २१/– |
| ३) | फिरस्ता–(लेख)–वसंत पोतदार | रु. १५/– |
| ४) | मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे–(आत्मचरित्रात्मक लेख)–माधव कोंडविलकर | रु. २२/– |
| ५) | मी मंत्री झालो–(आत्मचरित्रात्मक लेख)–रमेश मंत्री | रु. २२/– |
| ६) | आलेख–(कादंबरी)–रणजित देसाई | रु. २०/– |
| ७) | नागझिरा–(कथा)–व्यंकटेश माडगूळकर | |
| ८) | खाली उतरलेलं आकाश–(कथा)–गंगाधर गाडगीळ | रु. २५/– |
| ९) | शेवटचे गांधी–माधव गडकरी | रु. १०/– |
| १०) | एक झलक पूर्वेची–(जपानचे प्रवास वर्णन)–माधव गडकरी | रु. १०/– |
| ११) | कोवळे दिवस –(कादंबरी)–व्यंकटेश माडगूळकर | रु. २४/– |

* The 20th Century is the age of knowledge explosion. Join Phoenix and be better informed.

**दि फिनिक्स लायब्ररी, २२७ सदाशिव पेठ, पुणे ३०.**

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# दुनिया मेरी जेब में

## आपण आपले दोन्ही पाय तोडून घेणार !

आपण ठरवून टाकलंय, आपले दोन्ही पाय तोडून घ्यायचे. ते एखाद्या गच्च भरलेल्या ट्रकखाली ठेवायचे किंवा भरधाव धावणाऱ्या डेक्कन क्वीनच्या रूळावर ठेवायचे किंवा एखाद्या शल्यशास्त्र पारंगत किंवा शस्त्रक्रियाविशारदाकडून चक्क ampute करून घ्यायचे; पण आपले दोन्ही पाय तोडून घ्यायचे.

तुम्ही म्हणाल, का ? तर त्याचे प्रच्छन्न उत्तर–पाय तोडल्यावर माणूस किती सामर्थ्यवान बनतो, याची तुम्हाला कल्पना नाही, महाराजा. त्याची स्थिती मग एकदम 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि, नैनं दहति पावक:' अशीच बनून जाते. शिवाय या आत्मसंरक्षक कवचकुंडलांप्रमाणे दुसऱ्यांवर हल्ला करण्यासाठी अस्त्रांचाही साठा त्याच्याकडे जमतो.

आणि तुमच्या प्रश्नाचे स्पष्ट उत्तर–पहा, 'दुनिया मेरी जेब में.'

करण (शशीकपूर) आणि विशाल (ऋषीकपूर) हे दोघे (अनुक्रमे थोरला व धाकटा) भाऊ. (ही शशी कपूरची अकाली जवानी म्हणावी की ऋषीचे अकाली प्रौढत्व ?) तर यांपैकी करण सर्कसमध्ये झुल्यावरच्या कसरती करून आपल्या भावाला एका बड्या कॉलेजात–ज्या ठिकाणी फक्त राजा–महाराजांचीच मुले शिकत असतात–अशा कॉलेजात शिक्षण देत असतो. पण आपण सर्कशीतील झूलाकार आहोत, हे विशालला न सांगता आपण अतिशय श्रीमंत उद्योगपती असून निम्मी मुंबई आपल्या उजव्या खिशात आणि उरली सुरली डाव्या खिशात असल्याचे करणने विशालला सांगितलेले असते. (या ठिकाणी डोक्यावर धडका मारणारा पहिला प्रश्न–ह्या लपवा छपवीचे कारण काय ? जर विशालला भावाची गरिबी, आपले महागडे शिक्षण याचे वाईट वाटणार असेल; तर मुळात त्याला असल्या दिखाऊ मोठेपणाच्या कॉलेजात पाठवावे कशाला ? पण आपल्या य:कश्चित क्षुल्लक प्रश्नांची बऱ्यापैकी समाधानकारक उत्तरे मिळतील, अशी अपेक्षाच नसल्याने किंवा तशी ती मिळणार नाहीत, हीच खात्री असल्याने मी सागर लाटांच्या माऱ्यात अविचलपणे उभ्या असलेल्या दीपस्तंभाप्रमाणे माझे डोके खडक केले, सर्व प्रश्न निकराने पिटाळून लावले आणि पुढे पाहू लागलो.) पुढे आपण श्रीमंत आहोत. हे विशालला पटविण्यासाठी करणचे उपद्व्याप पाहून जरा गंमत यायला लागली. तेवढ्यात सगळे फसले, अर्थात खलनायक प्रवेशतो. मग एक खून एक चोरी, त्याचा करणवर येऊ घातलेला आळ आणि अखेर करण व विशाल यांच्या संयुक्त अंगमेहतीने त्या किटाळापासून करणची झालेली मुक्तता इत्यादि इत्यादी इत्यादि. या सगळ्या धामधुमीतच मध्येच एकदा करणला अपघात वगैरे होऊन त्याचे दोन्ही पाय जातात आणि त्याच वेळी सॅम्सन ज्याप्रमाणे डोक्यावरचे केस वाढायला लागले की बलिष्ठ व्हायचा त्याप्रमाणे करण पाय तोडल्यामुळे सामर्थ्यवान बनतो. नंतर त्याने केलेल्या दोन–तीन गोष्टी जर मी सांगितल्या तर त्याच्या ताकदीची कल्पना येईल तुम्हाला. एक–मुंबईच्या ट्रॅफिकभरल्या रस्त्यांवरून ताशी पन्नास–साठ मैल वेगाने आपल्या घसरगाडीवरून सरकणे. दोन–पंधरा–वीस गुंडांना लीलया लोळवणे. तीन–हवेतून उड्डाण करून प्रतिस्पर्ध्याला जायबंदी करणे. चार–आकाशात उडत्या हेलिकॉप्टरमधून धडाधड उड्या मारणे. ही यादी बरीच लांबवता येईल.

करणला ज्याप्रमाणे अपघात होतो त्याप्रमाणे विशालही मध्यंतरीच्या मोकळ्या वेळात आपले जमवून टाकतो. शिवाय करणला मदत करण्यासाठी श्री. व (भावी) सौ. विशाल (नीतू सिंग) मध्येच एकदा अरब–अरबही खेळूनही घेतात.

संपूर्ण चित्रपटात सर्कसची काही दृश्ये छान. म्हणजे संपूर्ण तीन तासभर जर अशीच थरारक दृश्ये दाखवली असती तर ते जास्त सुसह्य झाले असते. पण एवढा प्रेक्षकांचा विचार केला तर मग तो हिंदी चित्रपट कसला ? आजकाल कोणत्याही चित्रपटात ऋषीकपूर–नीतूसिंग म्हटले की, निदान दोघांचे नाचणे हा तरी जरा बघणेबल भाग असतो; पण या चित्रपटात नीटस तालाची गाणी न मिळाल्याने ते नाचणेही फारसे बरे जमलेले नाही. बाकी काय लिहिणार ? हो, आणखी एक सूचना–शशीकपूरला अपघातानंतर ज्या इस्पितळात दाखल करण्यात आले, त्या ठिकाणी कोणी जाऊ नये, अशी नम्र सूचना. त्याच्या बिचाऱ्याच्या कपाळावरची जखम अगदी स्वच्छ, मुलायम बरी झाली होती; पण त्याला भेटायला आलेल्या आगाशी बोलताना एक वाक्य संपवून दुसरे वाक्य सुरू करण्याच्या आत पुन्हा आपली 'भाली खपली असे धरली.' आता एकदा पूर्ण बरी झालेली जखम ज्या ठिकाणी पुन्हा नव्याने उत्पन्न करीत असतील, त्या इस्पितळाचा भरवसा धरायचा तरी कसा ?

असो. एकूण समग्र चित्रपटात कथालेखक–दिग्दर्शक टिन्नू आनंद यांनी कथा व दिग्दर्शन दोन्हीसाठी जवळच्याच किराणा–भुसार व्यापाऱ्यांकडून मीठ–मसाला आणला आणि नाच, गाणी, रहस्य, मारामाऱ्या इत्यादींची रेलचेल उडवून दिली.

कलाकारांपैकी शशीकपूरचे काम फार सोपे झाले होते. त्यांच्या कामापैकी निम्मे काम म्हणजे झूलाकारी त्यांच्या डमीनेच पार पाडली. शशीकपूर, ऋषीकपूर, नीतू सिंग इत्यादि खूप वेळ पडद्यावर असणाऱ्या लोकांच्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर पेंटल, आगा, केश्तो मुकर्जी हे अतिशय थोडा वेळ नजरेपुढे असलेले कलाकारच अधिक भाव खाऊन गेले.

चित्रपटाचे गीतकार गुलशन बावरा, संगीतकार राजेश रोशन. 'आज मौसम कह रहा है' हे अमितकुमार–लताचे द्वंद्वगीत सुरेख. बाकी गाणी ठीक. फक्त 'ये भी दिल माँगता' हे गाणे ऐकणे व पाहणे म्हणजे स्वत:च स्वत:वर अत्याचार करून घेण्यासारखे आहे.

तर शेवटी तात्पर्य काय ?

आपण आपले दोन्ही पाय तोडून घेणार.

□

पुण्याला
भेट देणारी

# शेवटचीच सर्कस

**बालक वर्षानिमित्त बालकांना दाखविण्याजोगी निर्भेळ, सकस करमणूक**




पहा – फिरत्या गोळ्यावरील वाघाचे नृत्य ✻ १०० मैल स्पीडच्या जीप-मोटार सायकली क्रॉस जंप ✻ अवकाशातील फिरत्या आर्यभट्टावरील ✻ तरुणींच्या अधांतरी कसरती ✻ उंचावरील अंधारातील तरुण तरुणींची श्वास रोखून धरणारी ट्रॅपीजची कामे ✻ प्रेक्षकांचे दोन्ही हात जोडून स्वागत करणाऱ्या वाघांची पलटण ✻ सर्कशीतील पाळीव प्राण्यांनी चालविलेली सुपर फास्ट मिनी डेक्कन क्वीन.

**तिकिटाचे दर–**
गॅलरी २।–, दुसरा वर्ग ३।५०,
१ ला वर्ग ५।–, ड्रेस सर्कल ६।५०

अॅड. बुकिंग ९ ते १.

## १०० जंगली प्राणी व १५० खुबसुरत तरुणी

**यांच्या श्वास रोखून धरणाऱ्या कसरती दाखविणारी आशियातील सर्वश्रेष्ठ नाविन्याने नटलेली**

**शुक्रवार ता. ९ नोव्हेंबर पासून सुरू ❀ रोज ३ खेळ ३, ६-१५, ९-३० वाजता.**

**स्थळ – सा र स बा ग , पु णे** पुणे म्युनिसिपल स्पोर्टस् ग्राऊंड

( नवतरंग पब्लि. )